# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU  Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 6 | Marathi Monthly | Thane, Friday , 1 December - 2023 to 31 December - 2023 | Pages 16 | Price : 10/-

# आंदोलनांची पुण्याई संपल्यामुळेच, भांडवलदारी-व्यवस्था फोफावली...!!!

## शेतकरी व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात राजन राजे यांचा, प्रस्थापितांवर जोरदार घणाघात...

**''या महाराष्ट्रात कंत्राटी-कामगारपद्धतीविरुद्ध, मी गेली २५/३० वर्षे लढतोय. 'कंत्राटी-कामगार पद्धत' ही गुलामगिरी तर आहेच, पण ती एकप्रकारची नव-अस्पृश्यतादेखील आहे. अस्पृश्यता म्हणजे, एका विशिष्ट समाज-घटकाने समाजाच्या दुसऱ्या मोठ्या हिश्श्याला विकासाच्या परिघाबाहेर ढकलून देत, त्याला जगण्याचा सन्मान आणि त्याला विकासाचे मूलभूत फायदे नाकारणे... 'कंत्राटी-कामगार पद्धत', ही नव-अस्पृश्यता यासाठी की, या प्रकारच्या अस्पृश्यतेत जन्माची जात गुंतलेली नसली; तरी, जन्माचं पोट गुंतलेलं आहे आणि तो कंत्राटी-कामगार अर्धपोटी आहे, त्याला माणुसपणाचे हक्क कामाच्या ठिकाणी नाकारलेले आहेत!**





मी, गेली तीन दशकं एकहाती या व्यवस्थेविरोधात 'धर्मयुद्ध' पुकारुन संघर्ष करतोय. लोकचळवळीकडून, डाव्या चळवळीकडून याबाबतीत काही मोठ्या त्रुटी राहून गेल्या. . डाव्या विचारसरणीच्या कम्युनिस्टांनी 'नागरी आण्विक दायित्व कायदा-१२३' (Civil Nuclear Liability Bill-123) साठी बंगाल-केरळमधील आपले ४३ खासदार संसदेत पणाला लावले; पण, भारतातील सर्वात मोठी समस्या असलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरोधात त्यांना अंशानेही तसं काही करावसं वाटलं नाही, हे देशाचं आणि एकूणच डाव्या चळवळीचं फार मोठं दुर्दैव आहे. एकांडी शिलेदारी करीत 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरोधात आम्ही बेंबीच्या देठापासून बोंबलून-बोंबलून थकलो, मोठमोठी आंदोलनं केली, संपासारखे टोकाचे संघर्ष केले, बड्या बड्या राजकीय नेत्यांना भेटलो, सर्वपक्षीय प्रमुखांच्याही भेटीगाठी घेतल्या... पण, आमच्या हाती 'राजकीय ताकद' नसल्याने कंत्राटीकरणाची विषवल्ली.. *(पान क्र. ७ वर)*

# छगन भुजबळचे कारनामे

*...संजीव कोकिळ – मुंबई पोलीस दल*

**मित्रहो,**

**सन २००० ते २००३ हा काळ, माझा CB Control (CID), मुंबई येथे गेला. पेट्रोल माफियांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करता करता, खूप काही निरीक्षण करु शकलो... जे काही निष्कर्ष होते, ते फार धक्कादायक होते.**



कधिकाळी मुंबईच्या गोदीत/शिवडी/वडाळा भागात जिथे तेल/पेट्रोल साठवून नंतर वितरीत व्हायचं, तिथे किरकोळ चोऱ्या करत करत, चिंधीचोरीवर जगणारे काही कुशाग्रबुध्दीचे हमाल/भंगारवाले/टँकर क्लिनर्स यांनी डिझेल/पेट्रोलचं महत्त्व ओळखलं, वितरणातले कच्चे दुवे हेरले आणि टँकर ड्रायव्हरला वाटमारीत सामील करुन चोऱ्या सुरु केल्या. तोपर्यंत भेसळ हा प्रकार नसावा. पण, ज्या वेळी 'नाफ्ता' आयात ही भानगड सुरु झाली व त्याचा परवाना फक्त, एकमेव उद्योगपतीला मिळाला. तेव्हा पेट्रोल साधारण १६ रु. लिटर तर, ...*(पान क्र. ५ वर)*

# घराणेशाही वाईट, हे एका मर्यादेपर्यंत ठीकच...

**('राजकीय घराणेशाही'च्या संदर्भात ७ जुलै-२०२२ रोजी म्हणजेच, मिंधेगटाच्या 'सूरत ते गोवा व्हाया गुवाहाटी', या गद्दार-पलायनाच्या काळ्या पार्श्वभूमीवर, 'धर्मराज्य पक्षा'तर्फे प्रसारित करण्यात आलेल्या, एका अत्यंत महत्त्वपूर्ण तार्किक मुद्द्याचा... थोड्याफार फरकाने, शिवतीर्थावरील 'दसरा-मेळाव्या'तील आपल्या झंझावाती भाषणात, मा. उद्धवजींकडूनही प्रकर्षाने उल्लेख केला गेला, तो संपूर्ण संदेशच वाचकांसाठी पुन्हा एकदा प्रसारित करीत आहोत...)**

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

*...(पान क्र. ३ वर)*

अंतरंग



ठाणे शहराची वाट लावण्यात एकनाथ शिंदेंचा हात!
पृष्ठ क्र. ८



दारिद्र्याची व्याख्या...
...संजीव चांदोरकर
पृष्ठ क्र. ९



''महाराष्ट्र टाइम्सचा वैचारिक गर्भपात''...
पृष्ठ क्र. ११

भारतीय परराष्ट्रीयनीतिचा पोकळ डोलारा!
पृष्ठ क्र. १४

# पाळीव आणि भटक्या प्राण्यांसाठी, ठाणे शहरात दहनभट्टी उभारण्यात यावी !

## 'धर्मराज्य पक्षा'ची महापालिका आयुक्तांकडे मागणी..

**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे शहरात कुत्रे आणि मांजर या पाळीव प्राण्यांची संख्या मोठी आहे. किंबहुना त्याहीपेक्षा जास्त संख्या ही, भटक्या कुत्र्यांची आहे. अशा परिस्थितीत जर; आजार, अपघात किंवा वयोमानामुळे या प्राण्यांचा मृत्यू झाल्यास, त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमी नसल्यामुळे, अडचणींचा सामना करावा लागतो. याच पार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मालाड (प.) येथे पर्यावरणपूरक व सीएनजी इंधनावर आधारित, ५० किलो क्षमतेच्या प्राण्यांसाठी दहनभट्टी उभारण्यात आलेली आहे. ही सेवा पाळीव श्वान, भटके मृत श्वान, मांजरी, पक्षी व लहान मृत जनावरे यांच्यासाठी मोफत असून, यामुळे रस्त्यात मृत पावलेल्या प्राण्यांच्या मृतदेहाची योग्य ती विल्हेवाट लागेलच; मात्र, त्याचबरोबर पाळीव प्राण्यांच्या मालकांनाही मोठ्याप्रमाणात दिलासा मिळालेला आहे. याच अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेनेदेखील, पर्यावरणपूरक आणि सीएनजी इंधनावर आधारित, दहनभट्टी उभारावी, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, ठाणे शहरात कुत्रे व मांजरी यांची संख्या मोठी आहे. त्यांच्या मृत्यूपश्चात, त्यांच्या मालकांकरवी वेगवेगळ्या प्रकारे अंत्यसंस्कार केले जात असले तरी, ते आरोग्यदृष्ट्या योग्य असतीलच असे नाही. शिवाय, भटक्या प्राण्यांच्या विशेषतः कुत्र्यांच्या रस्त्यावरील मृतदेहांमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असतो, तो वेगळाच. त्यामुळे, निसर्गरक्षण आणि पर्यावरण-संवर्धनाच्या माध्यमातून, ठाणे महानगरपालिका प्रशासनाने आमच्या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली आहे.

# ...'मी परत येईन, मी परत येणार' फेम उपमुख्यमंत्र्यांच्या वरील उद्गारासंदर्भात, त्यांना समस्त महाराष्ट्रीय जनतेकडून काही विचारणा....




१) 'शांततापूर्ण आंदोलने जरुर करावीत', याचा गर्भित अर्थ, ''आमच्या मातृसंस्थेची शिकवणच मुसोलिनीच्या धर्तीची 'काळी टोपी'वाली (कशी, ते वाचकांनीच जाणावं) ...तेव्हा, विचारतो कोण, तुमच्या असल्या षंढ-अहिंसक आंदोलनांना?'' असा घ्यायचा का?

२) ''हिंसक प्रकार घडल्यास पोलिस बघ्याची भूमिका घेणार नाहीत'', याचा दुसरा अर्थ, ''कितीही तुमची भूमिका न्याय्य असली, तुमच्यावर 'व्यवस्थे'करवी कितीही जुलूम-जबरदस्ती, अन्याय-अत्याचार होत असले किंवा 'व्यवस्थे'करवी तुमचं कितीही अमानुष शोषण होत असलं... तरीही, तुम्ही निषेधात्मक फारतर, कायमच 'परिणामशून्य' अहिंसक आंदोलनंच करत रहायची व स्वतःचं फसवं समाधान करुन घेत रहायचं... आणि, याद राखा, जर का सगळे सनदशीर मार्ग खुंटलेले पाहून, 'आखरी रास्ता' म्हणून तुम्ही 'हिंसक' बनलात; तर मग, आमचं काम अगदीच सोप्पं कराल... इस्रायली पोलिस आणि लष्कर कसं, 'चुन चुनके' पॅलेस्टाईनींना गोळ्या घालून मारतं किंवा मनमानी खऱ्याखोट्या आरोपाखाली दीर्घकाळ तुरुंगात डांबतं; तशीच, तुमची गत करुन तुम्हाला मुळापासून संपवण्यात येईल... म्हणजे तुमच्या समस्या, तुमच्यावरचे अन्याय-अत्याचार, तुमचं शोषण वगैरे जे काही आमच्या रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्थेकडून (Vampire-State System) चाललंय, असं तुमचं म्हणणं आहे... ते ही आपसूकच संपेल की'', असा घ्यायचा का?

३) ''महाराष्ट्रात हिंसेला अजिबात थारा देणार नाही'' म्हणता; ''तर मग, हिंसेला भारतात नेमका 'थारा' कुठे, तेही उपमुख्यमंत्रीसाहेबांनी सांगावं... भाजपाच्या उत्तर प्रदेशात की, गुजराथमध्ये...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# मराठी माणसाच्या जगण्याची चव बिघडू नये यासाठी, 'धर्मराज्य पक्ष' कार्यरत!

**पनवेल : मराठी माणूस म्हटला की, सार्वजनिक उत्सव हा त्याच्या जगण्याचा अविभाज्य भाग असतो. एकप्रकारे ही बाजू संभाळत असताना, दुसऱ्या बाजूने पाहिलं तर, मराठी माणसाच्या जगण्याची चव कुठे बिघडतेय का? यावर आम्ही काम करीत असल्याचे स्पष्ट प्रतिपादन 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, कामोठे येथे केले. 'कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय' आणि 'झेंडा सामाजिक संस्था' यांच्या वतीने, पनवेल तालुक्यातील कामोठे येथे दि. १८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर-२०२३ पर्यंत 'आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव-२०२३' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी राजन राजे हे, दि. २२ नोव्हेंबर-२०२३ रोजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलेले असता, कामोठेवासीयांना संबोधित करताना त्यांनी हे उद्गार काढले.** यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, ''२०११

**कामोठे महोत्सवात राजन राजे यांचे प्रतिपादन...**




यावर्षी, कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आणि झेंडा सामाजिक संस्था यांनी, कामोठे महोत्सव सुरु केला, नेमक्या त्याचवर्षी याच नोव्हेंबर महिन्याच्या १६ तारखेला आम्ही, जनसामान्यांसाठी व महाराष्ट्रातील मराठी माणसांसाठी, मूलभूत मूल्यं घेऊन 'धर्मराज्य पक्षा'ची स्थापना केली. गेली १२ वर्षे राजकीय आणि सामाजिकक्षेत्रात कार्यरत असताना, सर्वसामान्य मराठी माणूस डोळ्यासमोर ठेऊनच समाजकारण केलं. लवकरच आम्ही, पोलिसांना बोनस मिळावा यासाठी मोर्चा काढतोय. **एकीकडे महाराष्ट्रात आरक्षणाचं रण पेटलंय; तर, दुसरीकडे कंत्राटी-कामगारपद्धतीमुळे कष्टकरी मराठी समाज उध्वस्त होतोय. या गोष्टींचा विचार करत असताना, आमचा सर्वसामान्य मराठी माणूस नक्की सुखी आहे का? हेदेखील आपल्याला तपासून पाहणं गरजेचं आहे. एका बाजूला महोत्सव हे सुरु राहिलेच पाहिजेत, पण दुसऱ्या बाजूला ही तफावत दूर होण्यासाठी प्रयत्नशीलही राहिले पाहिजे'' असे आवाहन करताना, ''आम्हाला राजकीय आधार मिळाला तर, आम्ही बरंच काही करु शकतो!'' असे नेमके सूतोवाचदेखील राजन राजे यांनी, आपल्या भाषणाच्या शेवटी उपस्थितांना संबोधित करताना केले.** दरम्यान, 'कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय' आणि 'झेंडा सामाजिक संस्था' यांचे संस्थापकीय-अध्यक्ष अशोक पावणेकर यांनी आयोजित केलेल्या या 'आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव-२०२३' या सांस्कृतिक कार्यक्रमात, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'अंतर्गत 'प्रकल्पग्रस्त स्थानिक भूमिपुत्र रिक्षा-टॅक्सी चालक, मालक संघटने'च्या पदाधिकाऱ्यांसह, 'धर्मराज्य पक्षा'चे गोपीनाथ भगत, महेंद्र म्हात्रे, गणेश नाईक, भाऊ म्हात्रे, पांडुरंग नाईक, चंद्रकांत भेंडे, स्वामी म्हात्रे, विश्वास गोवारी, विजय म्हात्रे, रामनाथ म्हात्रे, रमाकांत गोवारी, आदी पनवेल तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घराणेशाही वाईट, हे एका मर्यादेपर्यंत ठीकच...

**घराणेशाही वाईट, हे एका मर्यादेपर्यंत ठीकच... आम्हीही अनेकप्रसंगी त्यावर टीका केलेली आहे. पण, या बाबीची योग्यायोग्यता काही एका 'निर्वात पोकळी'त ठरवता येऊ शकत नाही. एकूण परिस्थितीचं सर्वपदरी भान बाळगूनच त्यावर, वेळोवेळी निर्णय केला गेला पाहीजे.**

**यास्तव, सध्या, वर्षानुवर्षे सोबत राहून, संघटनेचे सगळे फायदे ओरपून, ओरबाडून घेणारे आणि यथावकाश संधि मिळताच ठरवून दगाफटका, गद्दारी करणारे 'एकेक आणि एकूणएक' राजकारणी सरदार-बरकदार 'नग' पाहीले की, मग घराणेशाही तितकीशी घातक वाटेनाशी होते (कारण, विश्वास ठेवायचा तरी कोणावर, गवतात बेमालूम दडलेले 'विषारी साप' नजरेनं टिपायचे तरी कसे... हा 'यक्षप्रश्न' सध्याच्या सकळ विश्वासघातकी राजकारणात, प्रत्येक पक्ष-नेतृत्त्वासमोर उभा आहेच)... फक्त, यासंदर्भात, राजकीय वारस म्हणून पुढे सरसावणाऱ्या व्यक्तिचा वकूब आणि जनमानसातली जातिवंत लोकप्रियता, वेळोवेळी अजमावली जायला हवी, हे मात्र, शंभर टक्के सत्यच! सरतेशेवटी, निव्वळ ठोकळ, ढोबळ तात्त्विक चर्चेतून नव्हे; तर, समाजहिताच्या परिप्रेक्ष्यातूनच या गोष्टींचं परीक्षण व निरीक्षण केलं गेलं पाहीजे आणि अंतिम निष्कर्षाला पोहोचलं पाहीजे.**

शिवछत्रपतींचे महाकर्तबगार, व्यासंगी, विद्वान, जनकल्याणकारी सुपुत्र संभाजी महाराजांसारखं, 'व्यक्तित्व'... वारस म्हणून राजकारणात पुढे आलं; तर, समाजाचं भलं होईल की, बुरं? किती सोप्पं उत्तर आहे त्याचं... असं घराणेशाहीतून आलेलं सुयोग्य-सुजाण नेतृत्त्व, स्वागतार्ह असायला हवंच!

याउलट, लाखो लोकांना अत्यंत क्रौर्यपूर्ण व्यवहाराने यमसदनी धाडणारे नृशंस जर्मन 'हुकूमशहा' हिटलर (आपल्याकडच्या कुणा शासकाची याबाबत आसपासची तुलना होऊ शकते किंवा नाही, याचा निर्णय मात्र वाचकांचाच) इटलीचा बेनेटो मुसोलिनी, रशियाचा स्टॅलिन (सध्याचा, युक्रेनियन जनतेवर, माणुसकीला लाजवणारं भयंकर युद्ध लादणारा रशियाचा ब्लादिमीर पुतिनदेखील)... हे कुठल्याही घराण्याच्या वारशाने राजकीय सर्वोच्चपदी पोहोचलेले नव्हते वा नाहीत, हीदेखील एक लक्षणीय बाब सद्यस्थितीत विचारात घेतली पाहीजे! (हाच तो, मा. उद्धवजींच्या भाषणातील महत्त्वपूर्ण मुद्दा....)

**ज्यांच्यात काही 'न्यूनगंड' असतो किंवा ज्यांचं कौटुंबिक-स्वास्थ्य बिघडलेलं असतं... अशी माणसं 'मानसिक विकृती'कडे झुकत, अफाट मेहनतीने सर्वोच्चपदी पोहोचतात आणि जेवढ्या कठोरतेनं (खरंतरं, क्रौर्याने) त्यांनी राजकीय ध्येय गाठण्यासाठी स्वतःचं तारुण्य जाळलेलं असतं, त्यापेक्षा कैकपट कठोरतेनं, सत्तेवर येताच, ते आपल्या हेकट, हुकूमत गाजवण्याच्या विकृतीने हाताखालचा समाज अक्षरशः जाळत सुटतात... हे वैश्विक सत्य होय!** कॉर्पोरेटीय उच्चपदस्थ व्यवस्थापकीय मंडळीदेखील, अशाच परिस्थितीतून व याच मनोवृत्तीची घडलेली असतात आणि तेही कुठल्या वारसाहक्काने (भागधारक मालकवर्ग वगळता) त्या पदावर पोहोचलेले नसतात. उच्चपदस्थ होईपर्यंत घेतलेल्या अहोरात्र मेहनतीने व स्वतःवरच केलेल्या अन्याय-अत्याचाराने त्यांच्यात संवेदनशीलता, नीतिमत्ता फारशी शिल्लक उरलेली नसते... कॉर्पोरेटीय परिभाषेत त्या 'भावनाशून्यते'ला व आपल्या सोयीनुसार नीतिमत्तेलाच (flexible-ethos) 'व्यावसायिकता' (professionalism) म्हटलं जातं.

तेव्हा, सध्या संघीय आणि भाजपाई मंडळींकडून आपल्या देशात जो सातत्याने 'घराणेशाही'वर हल्लाबोल केला जातोय... त्याचं, नीट 'शवविच्छेदन' करुन पहा. 'घराणेशाही', ही तशी वस्तुतः, लोकशाही-व्यवस्थेवर फार गंभीर परिणाम वगैरे



करणारी बाब नसूनही (कारण, शेवटी लोकशाही-व्यवस्थेत गुप्त मतदानाचा हुकमी एक्का जनतेकडे असतोच) जाणिवपूर्वक त्यावरच, या हितसंबंधी मंडळींकडून जनसामान्यांचं लक्ष 'घराणेशाही'वरच (अर्थातच, विशेषतः कॉंग्रेसमधल्या) बळेच केंद्रित केलं जातंय; जेणेकरुन, त्यापेक्षा यांच्या शेकडो नव्हे हजारो पटीने मोठ्या असलेल्या अपयशांकडे, घोडचुकांकडे आणि अन्याय-अत्याचार-शोषण करणाऱ्या धोरणांकडे जनतेचं लक्षचं जाऊ नये. उदा. १) **डॉलरशी विनिमय दरासंदर्भात, पं. नरेंद्र मोदींच्या वाढत्या वयाला ओलांडून थेट लालकृष्ण अडवाणींच्या वयाला गाठू पहाणारा 'घसरता रुपया' (ज्यासंदर्भात, घसरता रुपया' म्हणजे, देशाची 'घसरती पत', असं २०१४ च्या निवडणुकीच्या प्रचारात नरेंद्र मोदीजी म्हणायचे... तेव्हा, एका डॉलरला ५८ रुपये मोजावे लागत होते आणि मोदींनी निवडून आल्यावर रुपया बळकट करुन ४० रुपयाला एक डॉलर मिळवून देण्याचं अभिवचन देशाला दिलं होतं)...**

२) सामान्य जनतेची कंबर मोडणारी आणि कबर खोदणारी, देशांतर्गत भडकलेली महागाई...

३) देशातली 'राफेल विमाना'पेक्षाही (त्या विमान खरेदीतल्या, दाबल्या गेलेल्या भ्रष्टाचाराबाबत, इथे काही बोलणं सध्या नकोच) वायुवेगाने वाढणारी 'बेरोजगारी' आणि देशातल्या तरुणाईला नाईलाजापोटी जबरदस्तीने करावी लागणारी तुटपुंज्या पगारातली 'अर्धरोजगारी' तसेच, 'कंत्राटी-कामगार पद्धती'तली भोगावी लागणारी ''गुलामगिरी व नव-अस्पृश्यता''...

४) कॉर्पोरेटीय क्षेत्रातील कंत्राटीकरणाच्या धर्तीवरच... लष्करातही 'अग्निपथा'वरुन वाटचाल करायला लावत गुलामगिरीच्या अंधःकाराकडे नेली जाणारी 'अग्निवीरां'ची फौज तयार करण्याचं भाजपाई 'भांडवली-षडयंत्र'...

५) ''बुलडोझर-रिपब्लिक ते बनाना-रिपब्लिक'', असा होऊ घातलेला देशाचा अधोगत राजकीय प्रवास... जातीजमातीत धार्मिक तेढ निर्माण करणारं आणि भारतीय जनतेतलं आपापसातलं सौहार्द्रपूर्ण वातावरण जाणिवपूर्वक नष्ट करणारं घृणास्पद व संतापजनक राजकीय-ध्रुवीकरण... त्यातूनच उद्भवलेलं ज्ञानव्यापी मस्जिद, संतापजनक नुपूर शर्मा प्रकरण, अवघ्या माणुसकीला काळीमा फासणारी उदयपुरची क्रूर हत्या, बंगालची काली-माता प्रकरण वगैरे वगैरे...

६) देशाची सगळी साधनसंपत्ती विकून देशभरातील बँका, सरकारी उपक्रम यांच्या 'खाजगीकरणा'चा बकासुर-नरकासुर निर्माण करत जनतेला ''दे माय, धरणी ठाय'' करुन सोडणं...

**७) आपल्या घृणास्पद राजकीय हेतूपूर्तिसाठी सगळ्या दमनकारी सरकारी-यंत्रणा (ईडी, आयटी, सीबीआय, केंद्रिय सुरक्षादले व इतर पोलिस-निमलष्करीदले इ.) यांचा बेमुर्वतखोर व बेगुमानपणे वापरुन केवळ, 'विरोधी पक्षा'तीलच लोकप्रतिनिधींनाच ''जाणिवपूर्वक जाहीररित्या भयंकर अवमानित करत'' (उदा. आपल्याच पक्षातल्या बोबडकांद्यांना किंवा 'राणा'भीमदेवी थाटात बकवासबाजी करणाऱ्यांना याबाबत चॅनेल्सवरुन पेश करुन आणि 'विरोधी पक्षा'तील लोकप्रतिनिधींना दिवसेंदिवस, तासन्तास या दमनकारी सरकारी-यंत्रणांच्या दहशतवादी दरबारात तिष्ठत ठेऊन) लोकशाहीचा मुडदा पाडणं...**

८) चीनचं, लडाखमधल्या आपल्या मोठ्या भूभागावर कब्जा करुन बसणं...

**वरील संदर्भात, सध्याचे 'घराणेशाही'चे मुद्दाम सतत पुढे आणले जात असणारे मुद्दे, काळजीपूर्वक नीट तपासून पहाता... राहुल गांधी यांचं कॉंग्रेसचं नेतृत्त्व आणि आदित्य ठाकरे यांचं शिवसेनेचं नेतृत्त्व (मा. उद्धवजींनी स्वतःला या पूर्वीच शिवसेना-नेतृत्त्वाबाबत निर्विवादरित्या 'सिद्ध' केलेलं असल्यानं, त्यांच्या नेतृत्त्वाची चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही), हे जनमान्य व अतिशय योग्यच ठरतं आणि दोघांकडेही त्यांच्या पूर्वसुरींसारखा मोठा 'करिष्मा' नाही... हे एका अर्थी बरंच आहे; कारण, कदाचित त्यामुळेच, त्यांचे पाय जमिनीवर व्यवस्थित टिकून-टिच्चून आहेत, हे अनेक प्रसंगी दिसून आलंय.**

मला स्वतःला जर कुणी विचारेल तर, ''एकवेळ मी 'राहुल गांधींचं नेतृत्त्व स्विकारु शकतो; पण, अरविंद केजरीवाल यांचं मात्र नाही'' ते यासाठी की, मी राहुल गांधींवर विश्वास ठेऊ शकतो; पण,... *(पान क्र. ४ वर)*

## घराणेशाही वाईट, हे एका मर्यादेपर्यंत ठीकच...

*...(पान क्र. ३ वरुन)*

...पूर्वानुभवावरुन अरविंदजींवर नव्हे (अरविंदजींनी त्यांच्या दिल्लीतील कारकीर्दीत मोहल्ला-क्लिनिक्स किंवा दर्जेदार सार्वजनिक क्षेत्रातील शिक्षण-व्यवस्था, भ्रष्टाचार-निर्मूलन याबाबत केलेलं स्पृहणीय कार्य विचारात घेऊनदेखील). नेतृत्त्वाकडे बाकी कुठल्या गुणांची वानवा एकवेळ असली तरी चालेल; पण, 'विश्वासा'ची कमतरता असून बिलकूल चालणार नाही!

तेव्हा, ''उत्तिष्ठत जाग्रत।'', Arise Awake, जागो और उठो, जागे व्हा आणि उठा... देशात नेमकं काय राजकारण रटरटा शिजतंय त्याचा नीट कानोसा घ्या, ''आपण नेमक्या कुठल्या 'हिंदुत्वा'च्या बाता मारतोय''... मानवजातीसह अवघ्या सजीवसृष्टीचं, म्हणजेच, निसर्ग-पर्यावरणाचं सर्वोच्च भान बाळगणाऱ्या शिवबा-संतांच्या उच्चकोटीच्या 'हिंदुत्वा'च्या की, भाजपाई संधिसाधू व अन्यायी-शोषक कॉर्पोरेटीय 'हिंदुत्वा'च्या... याचा धांडोळा घ्या व डोळस राजकीय वाटचाल करा... अन्यथा, काळ मोठा कठीण आलाय !

**लक्षात ठेवा, 'मराठीत्वा'सोबत शिवबा-संतांचं 'हिंदुत्व', एखादं पृथ्वीमोलाचं लेणं लेवून आल्यासारखं दमदार पण, महन्मंगलपावलांनी आपसूकच येतं; पण, भाजपाई अमंगळ 'हिंदुत्वा'त मात्र, 'मराठीत्वा'चा लवलेशही नसतो आणि त्यांच्या ढोंगी, शोषक, बनावट 'हिंदुत्वा'ने (ज्याची, दुर्दैवाने शिवसेनेला दीर्घकाळ भुरळ पडली होती) गेल्या तीसएक वर्षांत महाराष्ट्रात सामान्य मायमराठी-माणसांना उध्वस्त केलंय, बरबाद केलंय... तेव्हा, पुनश्च 'हरिओम्' करुया... यापुढे जाज्वल्य, ज्वलंत प्रवास करायचा, राजकीय प्रवाह जागृत करायचा... तो 'मराठीत्वा'चाच !!!**

''संयुक्त महाराष्ट्रानंतर...आता, 'स्वायत्त-महाराष्ट्र'.... राष्ट्रांतर्गत राष्ट्र 'स्वायत्त-महाराष्ट्र'... 'शिवछत्रपती राष्ट्र' !!!''

।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।

*... राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

....पिढ्यापिढ्यांची बांधबंदिस्ती-कमाई करु पहाणाऱ्या लोभी-लुच्च्या मराठी 'नाईक-राणे-शिंदे-पवार-पाटलां'ना अचूक हेरुन व त्यांना आपल्या खिशात घालून... 'मेहता-शहा-पटेल' महाराष्ट्रात मातलेत! ''म्हातारी मेल्याचे दुःख नाही, काळ सोकावतो''...तो महाराष्ट्रात भयंकर सोकावलाय आणि त्यातूनच पटेल, शहा, मोदी, मेहता, जेठा, अग्रवाल-अगरवाल, गाला आडनावांची गुजराथ-मारवाडची ब्रिगेड... शिवबा-संतांच्या पावनभूमित, आमच्या डोळ्यासमोर पिशाच्चिक व पैशाचिक धुमाकूळ घालतेय. राजकीयदृष्ट्या प्रभावशाली असलेले 'मराठे-ओबीसी-बीसी' नेते व अभिजन मंडळी, बोली लावून भरबाजारी त्यांच्या हातून सहजी खरेदी-विक्री केले जातायत आणि आम्ही मात्र...त्याच दलाल मराठी राजकीय नेतेमंडळींकडे भीक मागत फिरतोय, **''अन्यायाच्याच दारातच, न्यायाची अपेक्षा करतोय!'' आपल्याच जातीची माती खाणारे 'मुस्लिम-मराठे-ओबीसी-बीसी' नेते, उंदीर-घुशींसारखे उदंड झालेत आणि या राजकीय उंदीर-घुशींनी शिवबा-संतांच्या राकट, कणखर, दगडांच्या महाराष्ट्रदेशाची माती...प्रायः, गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाच्या आर्थिक-हितसंबंधांचं पीक जोमाने फोफावण्यासाठी पार भुगा करत भुसभुशीत करुन ठेवलीय; तरीही, जातधर्माच्या राजकारणाला इथे...ना आदी, ना अंत'! अठरापगड जातजमातींना व मुस्लिमांसह सर्व धर्मियांना, आपल्या राज्यव्यवस्थेत 'जातधर्मनिरपेक्ष' निर्भेळ 'न्याय' देणाऱ्या, शिवछत्रपतींच्या हृदयीची, ही केवढी मोठी खंत...???**

धर्मराज्य पक्ष

...याजसाठीच केला, आजच्याच दिवशी (१६ नोव्हेंबर-२०११) बरोबर एका तपापूर्वी, ''Zero Tolerance Towards Corruption and Exploitation of Man Nature'', या ब्रीदवाक्यावर आणि नीतिधर्मावर चालणाऱ्या... जातधर्म-निरपेक्ष व भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणवादी 'हरित पक्ष' असलेल्या, 'धर्मराज्य पक्ष' स्थापनेचा 'अट्टाहास'!

''संयुक्त-महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त-महाराष्ट्र'...राष्ट्रांतर्गत राष्ट्र 'स्वायत्त-महाराष्ट्र'... 'शिवछत्रपतीराष्ट्र'...!!!'' अशी उद्घोषणा करणारा क्रांतिकारी-पक्ष!!

शिवछत्रपतींची राजनीति, बाबासाहेबांचा 'समतेचा संदेश', 'गांधीवाद'; तसेच, कार्ल मार्क्सचा 'साम्यवाद'...यांची व्यवहारात जनहितार्थ सांगड घालणारा राजकीय पक्ष !

भ्रष्टाचार-निर्मूलनासाठी 'जनलोकपाल' व 'अर्थक्रांती' या दोन विधेयकांच्या आग्रहासह, 'कंत्राटी-कामगारपद्धती'तील 'गुलामगिरी-नवअस्पृश्यते'विरोधात 'धर्मयुद्ध' पुकारणारा एकमात्र पक्ष...!!!

(क्रमशः, लिखाण चालूच)

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)







'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज असोसिएशन' या संघटनेचा शताब्दी-उत्सव शुक्रवार, दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, भायखळा, मुंबई येथे मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. संघटनेच्या स्थापनेला १०० वर्षे झाल्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज असोसिएशन'च्या वतीने मा. राजन राजे यांचा पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शताब्दी-उत्सवाच्या कार्यक्रमाला, 'नाबार्ड'चे माजी संचालक डॉ. वाय.एस.पी. थोरात यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. त्याचबरोबर, श्रीमती उषा थोरात (माजी उप-व्यवस्थापक, आरबीआय), श्रीमती चारुलता कर (सीजीएम/एच.आर.-एम.डी., आरबीआय), श्री. समीर घोष (महासचिव, ऑल इंडिया रिझर्व्ह बँक असोसिएशन), श्री. अविरल जैन (विभागीय व्यवस्थापक, आरबीआय), श्री. अरविंद सावंत (खासदार, लोकसभा) आणि श्री. अनिल देसाई (खासदार, राज्यसभा) आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया असोसिएशन'चे अध्यक्ष : श्री. हेमंत गुप्ते, अध्यक्षीय सल्लागार : श्री. विलास पोतनीस, महासचिव : श्री. अजित सुभेदार, सचिव : श्री. संभाजी भोगले या पदाधिकाऱ्यांनी, विशेष मेहनत घेतली. दरम्यान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री. संजीव चांदोरकर, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव : श्री. महेशसिंग ठाकूर, महासंघाचे प्रतिनिधी : श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे ऐरोली विधानसभा सचिव : श्री. सिद्धेश सावंत-भोसले आणि पक्षाचे युवा कार्यकर्ते श्री. नितीन उगले आदी मंडळींनीदेखील या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली होती. याप्रसंगी मा. राजन राजे यांनी, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया असोसिएशन'च्या शताब्दी-उत्सवानिमित्त सर्व मान्यवर पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले

**छगन भुजबळचे कारनामे...** *(पान क्र. १ वरुन)*

नाफ्ता ७ रु. लिटर होता... अगदी बुध्दी पणाला लावून हा खेळ खेळला गेला व सर्व पंपवाल्यांच्या गळी उतरवला गेला. ६०% पेट्रोल + ४०% नाफ्ता अशी बेमालूम भेसळ व्हायची. एकच मंत्र शिकवला गेला, ''कर लो पैसा मुठ्ठी मे!'' मग काय सोडा फसफसून वहावा, तसा पैसाच पैसा या धंद्यात वाहत राहिला.

**त्या काळात दाऊद गँग/गवळी गँग/राजन गँग/अमर नाईक गँगची आपसातली साठमारी टीपेवर होती. पोलीसांना इकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. त्याचा विलक्षण लाभ ठराविक जणांनी उचलला. अल्पकाळात प्रत्येक पेट्रोल माफिया, हजारो कोटींचा मालक झाला. इतरांचेही डोळे विस्फारले. अतोनात पैसा पिकायला लागल्यामुळे धंद्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरु झाली. ''भला उसकी कमीज मेरे कमीज से ज्यादा सफेद कैसी'' या न्यायानं, एकमेकांचे जीव घ्यायला सुरुवात झाली.**

अमुक एकानं CBI ला तमुकची खबर द्यायची, त्याचा धंदा मारायचा, मग तमुकने अमुकचा मर्डरच करायचा, असे सूडनाट्य सुरु झाले. स्पर्धेचा नको इतका भयानक खेळ सुरु झाला. त्यात मग, खबरी लोकांचे मर्डर व्हायला लागले. भेसळीचं प्रमाण वाढत चाललं. पैशाची प्रचंड आवक/स्पर्धा यातून या धंद्याची बोंबाबोंब झाली. मग, अंडरवर्ल्डची नजर इकडे वळली नाही; तरच नवल. त्यांचेही डोळे फाटले, इतका पैसा? या धंद्यात?? मग दाऊद गँग/राजन गँग यात उतरली. त्यातून म्हमद्या/चांदभाइ/मुनीर लंगडा/दत्तू/गंगू/यादव/हर्षद अशी नावं पुढं यायला लागली, शिरजोर झाली. स्पर्धा आणखी तीव्र...एकमेकास शह-काटशह देण्यात सगळीकडे नुसता धुरळाच धुरळा उडायला लागला. शासनाच्याही नाकातोंडात चालला. पोलीस काम करत होते, पण तुटपुंजा स्टाफ! प्रयत्न तोकडे पडत होते आणि या अफाट पैशाला खूप अधिकारी बळी पडत होते.

**माफियावर कारवाई म्हणजे, जीवास घातक ठरु लागली. माफिया क्रूर होऊ लागले. रेशनिंग इन्स्पेक्टर अशोक कदम यांचा सरळ सरळ खून झाला. धंदा टिकावा म्हणून, रक्ताची धुळवड सुरु झाली. माफियांनी मग खबरी लोकांचे गळे आवळायला सुरूवात केली. सर्वत्र भितीचे वातावरण... खबरे अचानक गायब! दूर खाडीत कुठेतरी दलदलीत अनोळखी प्रेतं सापडायला लागली. धंद्यात आता नवीन लोकांनी शिरकाव करायला सुरुवात केली. जे अधिक हुशार होते, त्यांनी गँगचा आधार घेतला, भ्रष्ट वरिष्ठांना जाळ्यात ओढलं, जुन्या लोकांचा काटा काढला आणि वर्चस्व प्रस्थापित केलं.**

असाच एक २८ वर्षाचा तरूण जळगावहून दाखल झाला. यात शिरला, अगदी ''करलो दुनिया मुठ्ठी में'', या तंत्रानं! तोच तो, 'अंतिम तोतला'! त्याने सरळ सरळ छगनभाऊ/समीर भुजबळ यांना पकडलं. समीर तरणा होता. गृहखातं पायाशी लोळण घेत होतं. त्याची सगळी हौसमौज अंतिमनं बिनधास्त पुरवली. समीर पाघळलाच! अंतिमचा निर्णय मग मार्केटमध्ये अंतिमच व्हायला लागला. धंद्यातला LION's SHARE त्यानं काका पुतण्याला देउन स्वत: सेफ झाला... त्यांना त्यानं आपलंसं केलं.

आता मार्केटचा दादा सिर्फ अंतिम... नसीम खान त्यावेळी अन्न/नागरी-पुरवठा राज्यमंत्री होते. त्यांनाही गळास लावलं. अंतिम समुद्रावरच नाफ्ता/केरोसीन घ्यायचा. बाकीच्या लोकांच्या मालाला उतरायची परवानगी नाही. फक्त, अंतिमचा माल मार्केटमध्ये चढ्या भावाने हातोहात विकायचा. प्रचंड नफा, तो सगळ्यांना वाटायचा. तेरी चूप मेरी भी चूप... यात वरिष्ठ पोलीस अधिकारी सामील झाले, काही अर्थातच अपवाद! कोणी कनिष्ठाने अंतिमच्या टँकरला हात लावला की, समीरचा दणका बसायचा... दुसऱ्या दिवशी बदली!

पोलीस आता अंतिमला घाबरायला लागले. IPS बदली साठी, त्याची मिनतवारी करु लागले. समीरभोवती IPSचा मेळा भरत होता. डोके झुकवत होता. कनिष्ठ हबकून गेले. याचा फायदा उठवत उठवत, अंतिम तोतला अक्षरश: माजला होता. पोलीसांना तुच्छ लेखत होता. IPSनासुध्दा तो अरे तुरे करत होता. मी त्याला अटक केली म्हणून, काका/पुतणे पिसाटले होते. त्याला अटक झाली म्हणून मार्केटसुद्धा हादरलं होतं.

**मला त्याचा एक फायदा झाला. खबरी लोक माझ्याकडे विश्वासानं यायला लागले. खबर देऊ लागले, केसेस होऊ लागल्या. सगळे हवालदिल झाले. माझ्याबरोबर तुटपुंजा स्टाफ होता. किती पुरणार? IPS ध. शिवानंदन सर बदलून गेल्यानंतर मग खझड भुजंगराव यांना त्यांच्या जागी आणलं. यांची निष्ठा वादातीत होती; पण, वागणं दुटप्पी होतं... माझ्या ते लक्षात आलं.**

**काका/पुतण्याचे आदेशच होते त्यांना; कोकीळला संपवा; नाही तर, ब्रँच तरी बदला! भुजंगरावांनी पाहिलं की, कोकीळ ऐकत नाही. मग चतुराईनं, त्यांनी फणा काढला... आता DCP होते IPS मनोज लोहिया. त्यांच्यामार्फत डाव खेळला. Airport वर तातडीचं काम आहे म्हणून रोज माझ्या ब्रँचचे ५ ते १० हवालदार/अधिकारी ट्रान्सफर करत राहीले, शिताफीने हळूहळू सगळी ब्रँचच रिकामी केली. मला कळेना काय चाललंय? ब्रँचमध्ये आता फक्त, एक संजीव कोकीळ/एक हवालदार/एक कारकून राहिला. आता कसली कारवाई करणार माफियावर? पुतण्या खूष झाला होता...मी अस्वस्थ होतो! आमच्याच वरिष्ठांनी IPSचं लेबल लावून डोक्यावर मिरवणाऱ्या सिंहाचा, असा बळी द्यायचा? छगनराव/समीरची खुशामत करण्यासाठी? माफियांना सेफ करण्यासाठी? मुंबई पोलीसदल कुठं चाललंय? माझी अस्वस्थता वाढीस लागली!!**

अशातच DCP, IPS मनोज लोहियांनी मला त्यांच्या ऑफिसमध्ये पाचारण केलं... मी सॅल्यूट केला. माझ्याकडे तुच्छतेनं पहात, कुत्सितपणे व छद्मीपणे हास्य करत ते उद्गारले, ''मि. कोकीळ, नाऊ यू आर अ कॅप्टन ऑफ टायटॅनिक शिप. hmsshmsshm! त्या वेळी हा सिनेमा गाजत होता. नाऊ बेटर यू गो टू भुजंगराव अँड आस्क फॉर सम अदर पोस्टींग. धिस ब्रँच इज क्लोज्ड नाऊ. hmsss hmsss hmssss!! ते पुन्हा हसले. माझ्या अंगाची लाही लाही होत होती, सणसणीत उत्तर द्यायची अनावर इच्छा दाबून टाकली. पुन्हा सॅल्यूट केला (नाईलाजानेच) अन् बाहेर पडलो. दुसऱ्या दिवशी संतापाच्या भरातच कमिशनर MN Singh सरांना भेटलो... थेट! मी केलेल्या कारवाईचा अहवाल दिला/जेरबंद केलेल्या माफियांची यादी दिली. विचारलं... सर, ब्रँच का बंद करताय ? IPS भुजंगरावांना हे अपेक्षित नव्हतं. सिंग सरांनी सगळं शांतपणे ऐकून घेतलं. संतापले, तेही. म्हणाले, मी ब्रँच बंद करायची ऑर्डर दिलीच नव्हती मुळी! त्यांनी मला उलट शाबासकी दिली, म्हणाले, जा, उद्यापासून जोरात कारवाई करा माफियांवर... मी सुखावलो, हुश्श! कुठेतरी कामाचं चीज होत होतं!!

त्या दिवशी, टी मिटींगमध्ये सिंग सरांनी भुजंगरावांची पार खरडपट्टीच काढली. त्याना दणका बसला होता. ब्रँच पुन्हा सुरु झाली. दणका खरा काका/पुतण्यांना बसला होता. मी ठोस कारवाई सुरु केली, केसेस पुन्हा होऊ लागल्या. काका/पुतण्याचा आणखी एक डाव धुळीस मिळाला होता. त्यांच्या संतापाचा उद्रेक झाला. **माझ्याविरुद्ध आणखी जहाल षडयंत्र शिजवले गेले. IPS भुजंगरावांनी आता आपला फणा टाकला. सळसळत ते माझ्या मार्गातून निघून गेले. त्यांची बदली ठाणे पोलीस कमिशनर म्हणून झाली. त्यांच्या जागी Joint CP Crime म्हणून काका/पुतण्याचे खास लाडके IPS श्रीधर वगळ आले. माझ्याविरुद्धच्या कटाचा सुगावा लागू न देता, ते मला गोड गोड बोलत होते. माझ्या कार्याचे निरीक्षण करीत होते. मला समजावण्याचा प्रयत्नही केला. माफियांवर केसेस करु नको... मी ठाम होतो. केसेस करतच राहिलो.**

अशातच एक बेरकी खबऱ्या माझ्याकडे आला. त्याचं नाव अमीर (सिनेमातील नव्हे). त्याच्याकडे पक्क्या खबरी असायच्या. त्याचं नेटवर्क चांगलं होतं. डिटेक्शन क्राईमचा तो खबरी होता. म्हणाला, साब एक बडा काम है, पटाओगे? बोलो मी विचारले. म्हणाला, साब... भिवंडीके गोडाऊनमे ८०० करोडके स्टँप पडे है. लफडेवाले... रेड करो... तोडपानी करो. बहुत पैसा मिलेंगा!

मी मनात चरकलो. एक तर हा माझ्या ब्रँचचा/कर्तव्याचा विषय नाही (मला काही कटाचा वास लागला) मी त्याची बोळवण केली, म्हटलं जा, क्राईम डिटेक्शनचा विषय आहे तिकडे जा...तो चरफडत गेला. मित्र हो, नियती मला कशी सांभाळत होती पहा! याच खबरीला हात घातला म्हणून. बनावट स्टँपचा हा घोटाळा तेलगीचाच होता आणि त्या रेड पायी फौ. दिलीप कामत/DCP प्रदीप सावंत/ IPS श्रीधर वगळ यांना तेलगीकांडात तुरुंगवास घडला. छगनराव बालंबाल बचावले!

ती खबर, त्या आमीरचीच. त्यानंतर तो कुठे जिवंत तर आढळला नाही, पण एके दिवशी त्याचे फुगलेले प्रेत मात्र, वाशीजवळ खाडीच्या दलदलीत सापडले.

**मित्रहो, खरं म्हणजे महाराष्ट्र पोलीस दलात असलेले सर्वच IPS अधिकारी अतिशय कुशाग्र बुद्धीचे / हुशार असून सर्व बाबतीत उत्कृष्टच आहेत. यात काही शंका नाही. पण बऱ्याच जणांनी स्वत:ला ''भ्रष्ट'' करुन घेतलं. अन्यथा, हे गुन्हेगारी विश्व फोफावलंच नसतं. हे सर्व अधिकारी देशातून विशिष्ट चाळणी करुन निवडलेले! पण, लोभाला बळी पडले. अन्यथा, गुन्हेगारी विश्व तर सोडाच... पाकिस्तानची माय तरी व्याली असती का, कसाबला इकडे एन्ट्री मिळायला...तीही इतके सहजी?**

पण, त्यातील थोडेच ''पांडव'' व बाकी सगळे ''कौरव'' सेनेतच भरती झालेत. अन्यथा, या महाराष्ट्र पोलिसांचा लेखाजोखा स्कॉटलंड यार्ड पेक्षाही बुलंद राहिला असता...पण, दुर्दैव! IPS अधिकारी म्हणजे शासन व कनिष्ठांमधला दुवा! हा सगळा दुवा पांढरा शुभ्र राहिला असता; तर, महाराष्ट्रच काय देशाला अभिमान वाटला असता?... *(पान क्र. ६ वर)*

# सीएनजी पासिंग करणाऱ्या खासगी एजन्सींना, ‘धर्मराज्य पक्षा’च्या रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेचा दणका...

## आता २६०० रुपयांऐवजी, अवघ्या ६०० रुपयांत होणार सीएनजी पासिंग

**ठाणे (प्रतिनिधी) : खासगी सीएनजी पासिंगद्वारे, रिक्षा-टॅक्सीचालकांची लूटमार करणाऱ्या एजन्सींना ‘धर्मराज्य पक्ष’प्रणित, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ’अंतर्गत कार्यरत असलेल्या ‘रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटने’ने दणका दिला असून, ठाणे शहर आणि मुंबई उपनगरांत, सीएनजी पासिंगसाठी रिक्षा-टॅक्सीचालकांकडून १८०० ते २६०० रुपये मनमानीपणे उकळले जात होते. मात्र, ‘धर्मराज्य पक्षा’च्या रिक्षा-टॅक्सी संघटनेने दणका दिल्यानंतर, आता अवघ्या ६०० रुपयांत सीएनजी पासिंग करुन देण्यास सुरुवात झाली आहे.** यामुळे समस्त रिक्षा-टॅक्सी चालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, फक्त ठाणे-मुंबईतच नव्हे; तर, संपूर्ण महाराष्ट्रातील रिक्षा-टॅक्सीचालकांना यापुढे ६०० रुपयांत सीएनजी पासिंग करुन मिळणार आहे. याप्रकरणी, ‘धर्मराज्य पक्षा’च्या रिक्षा-टॅक्सी संघटनेचे उपाध्यक्ष सुशीलकुमार चंद्रा आणि रवि मिश्रा या पदाधिकाऱ्यांनी, माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविल्यानंतर, खासगी सीएनजी पासिंग एजन्सींच्या माध्यमातून रिक्षा-टॅक्सीचालकांकडून अनधिकृतपणे पैसे उकळले जात असल्याचे उघड झाले. ही बाब, रिक्षा-टॅक्सी संघटनेच्या लक्षात आल्यानंतर, सुशीलकुमार चंद्रा आणि रवि मिश्रा यांनी, या प्रकरणाचा पाठपुरावा सुरु केला. ठाणे आणि मुंबईतील सीएनजी पासिंग करणाऱ्या खासगी एजन्सींची माहिती आणि त्याद्वारे रिक्षा-टॅक्सीचालकांकडून घेतली जाणारी रक्कम, याची माहितीच्या अधिकाराखाली माहिती प्राप्त झाल्यानंतर, प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे आणि मुंबई वाहतूक शाखा यांच्या मुख्यालयात सातत्याने पत्रव्यवहार करुन, तसेच संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन, खासगी सीएनजी पासिंग एजन्सींवर कायदेशीर कारवाई करण्याची व त्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी लावून धरली होती. शिवाय आंदोलनाचा इशारादेखील देण्यात आला होता. अखेर ‘धर्मराज्य पक्षा’च्या रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या प्रयत्नांना यश येऊन, यापुढे रिक्षा-टॅक्सीचालकांकडून ६०० रुपये आकारण्याचे आदेश प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि वाहतूक शाखेच्या वतीने, संबंधित खासगी सीएनजी पासिंग एजन्सींना देण्यात आले.

**दरम्यान, ठाणे शहरात ‘धर्मराज्य पक्ष’प्रणित, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ’अंतर्गत, रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेची स्थापना झाल्यापासून, ‘धर्मराज्य पक्ष’ आणि ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे अध्यक्ष राजन राजे यांच्या मार्गदर्शनाखाली, रिक्षा-टॅक्सीचालकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य संघटनेकडून सुरु असते. प्रवाशांची सुरक्षितता, त्यांच्याशी सौहार्दपूर्ण वागणूक आणि नियमाप्रमाणे भाडेआकारणी ही, ‘धर्मराज्य पक्षा’च्या रिक्षा-टॅक्सी संघटनेची कार्यपद्धती असून, राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली, रिक्षा-टॅक्सी चालकांच्या समस्यांना वाचा फोडण्याबरोबरच, प्रादेशिक परिवहन, वाहतूक विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून, रिक्षा-टॅक्सीचालकांना दिला जाणारा त्रास, याविरोधातदेखील आमची संघटना ठामपणे उभी असेल, अशी स्पष्ट भूमिका, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी यावेळी मांडली.** खासगी सीएनजी एजन्सींद्वारे, कष्टकरी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रिक्षा-टॅक्सीचालकांची आर्थिक पिळवणूक सुरु असताना, या अन्यायाविरोधात कोणताही राजकीय नेता किंवा पक्ष पुढे आला नाही. ‘धर्मराज्य पक्षा’ने मात्र, आक्रमक भूमिका घेत, आपल्या रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या माध्यमातून, सीएनजी पासिंगच्या नावाखाली सुरु असलेल्या लुटमारीला चांगलाच दणका दिलेला असल्यामुळे, फक्त ठाणे आणि मुंबई शहर व उपनगरांपुरता हा प्रश्न मर्यादित राहिलेला नसून, संपूर्ण महाराष्ट्रातील रिक्षा-टॅक्सीचालकांना यामुळे चांगलाच दिलासा मिळाला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, ठाणे वाहतूक शाखेच्या काही अधिकाऱ्यांनीही, ‘धर्मराज्य पक्षा’च्या रिक्षा-टॅक्सी संघटनेच्या या कार्याबद्दल कौतुक केले आहे. **प्रत्येक रिक्षा-टॅक्सीचालक हा, आम्हाला कुटुंबातील सदस्यांप्रमाणे असून, त्याच्यावर होणारा अन्याय आम्ही सहन तर करणार नाहीच; मात्र, तो चुकीचा जरी वागला तरी, त्याला पाठीशीही घालणार नाही, ही आमचे नेते राजन राजे यांनी आम्हाला दिलेली शिकवण असून, तिचे कर्तव्यभावनेतून आम्ही काटेकोरपणे पालन करण्यास कटिबद्ध आहोत, असे रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेचे उपाध्यक्ष सुशीलकुमार चंद्रा आणि रवि मिश्रा यांनी, यावेळी बोलताना सांगितले.**


### छगन भुजबळचे कारनामे... *(पान क्र. ५ वरुन)*

पण, हाय रे दैवा! गटबाजी, वैयक्तिक हेवेदावे, प्रत्येकाचे भयानक ईगो... यांनी हे प्रशासन पोखरुन गेलं आहे. फक्त, IPS अधिकाऱ्यांनी मनावर घेतलं तर आणि तरच, येथील गुन्हेगारी संपुष्टात येऊ शकते. अन्यथा, कनिष्ठांची काय बिशाद हो? ते हुकूमाचे ताबेदार. IPS नी डोळे वटारले की, सांगेल ते काम करायचं आणि केस वर आली की, मग जेलात जायचं! प्रचंड गाजलेला प्रत्येक एन्काउंटर स्पेशालिस्ट म्हणूनच तुरुंगात पुख्खा झोडत राहिला, हे त्यामुळेच. अशा वरिष्ठांची खोटी कामे करणारे; मग, आपली वसूली करतात व लुबाडणूक होते... ती सामान्य जनतेची, नागडा होतो तो अश्राप ‘‘नागरिक’’!

**कसं थांबायचं हे? आपण आपलं कर्तव्य चोखपणे पार पाडत रहावं, हेच योग्य मानून मी माझे कर्तव्य पार पाडत होतो. पण काका/पुतण्यांनी आता निर्वाणीचा डाव टाकला. IPS श्रीधर वगळ, DCP सुरेंद्र पांडेय IPS यांच्या सोबत त्यांनी महाराष्ट्र टाईम्सला (भरतकुमार राऊत/पत्रकार संजय व्हनमाने) या कटात मिडीया-पार्टनर करुन घेतलं! नवा खेळ क्रूर खेळ, यांनी मांडला होता. मी मात्र अनभिज्ञ होतो. अहो, साक्षात माऊली/नियती माझी पाठराखण करीत होती, या खेळात. मग चिंता कसली?**

**कै. व्ही. शांताराम यांच्या ‘कुंकू’ चित्रपटातील माझं आवडतं गीत गात व गुणगुणत मी परत कामाला लागलो. ‘‘मन सुध्द तुजं गोष्ट हाये पृथ्वी मोलाची, पृथ्वी मोलाची, तू चाल गड्या चाल तुला भिती रं कुनाची, तुला भिती रं कुनाची.’’**

काका/पुतणे, त्यांच्या तालावर नाचणारे IPS आणि त्यांना माझा छळ करायला भाग पाडणारे मुसाफिर खान्यातील सन्माननीय गुंड, यांनी मला दिलेली सर्वोत्तम भेट, ‘‘khaki gulab’’!




समाजमाध्यमातून साभार

## आंदोलनांची पुण्याई संपल्यामुळेच, भांडवलदारी-व्यवस्था फोफावली...!!!

*...(पान क्र. १ वरुन)*

अधिकाधिक फोफावली. मी, **'धर्मराज्य पक्षा'ची स्थापना यासाठीच केली. कारण, चळवळीतील नेत्यांनी, कंत्राटी-पद्धतीचा विषय लावूनच धरला नाही. दुर्दैवाने, आंदोलनांची पुण्याई आता संपलेली आहे. तुम्ही आमरण उपोषणाला बसलात, चक्री-उपोषणाला बसलात; तरी, शंभर टक्के सांगतो, तुमचे प्रश्न सुटणार नाहीत; त्यासाठी, तुम्हाआम्हाला निवडणुका जिंकून विधिमंडळात, संसदेत धडक द्यावी लागेल. कष्टकऱ्यांच्या अपरिमित शोषणातून चाललेली ही संपूर्ण भांडवलदारी व्यवस्था, देशात साम्यवाद-समाजवाद आणूनच संपवावी लागेल... इतर कुठलाही राजकीय पर्याय नाही'', अशा घणाघाती शब्दांत 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, प्रस्थापित राजकीय व्यवस्थेविरोधात जोरदार शरसंधान साधले.** महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने, मंगळवार, दि. २८ नोव्हेंबर-२०२३ रोजी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ शेतकरी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन करण्यात आले, त्यावेळी राजन राजे बोलत होते. केंद्र सरकारने जाहीर केलेला भाताचा हमीभाव अत्यंत तुटपुंजा असल्याने, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार, उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा धरुन, भाताला प्रति क्विंटल किमान चार हजारांचा हमीभाव देऊन, तसा कायदा करण्यात यावा, भातखरेदी केंद्रे पूर्ववत सुरु करण्यात यावीत, शेतकऱ्यांना वीजपंपासाठी मोफत वीजपुरवठा करण्यात यावा, शेतकरी-शेतमजूर व असंघटित बांधकाम कामगार आणि महिलांना, वयाच्या ६० वर्षांनंतर मासिक पाच हजारांची पेन्शन सुरु करण्यात यावी, सरकारी (जिल्हा परिषद) शाळांचे खासगीकरण थांबवून, कंत्राटी नोकरभरतीचा कायदा रद्द करण्यात यावा, आरोग्यसेवेचे खासगीकरण थांबवा आणि आरोग्यसेवेत आमूलाग्र सुधारणा करुन, सर्वसामान्य जनतेला मोफत सेवा देण्यात याव्यात, या आणि अशा अनेक मागण्यांसाठी, महाराष्ट्र राज्य किसान सभा, ठाणे जिल्हा यांच्या वतीने, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून, संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने, मंत्रालयावर धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले असून, त्याच पार्श्वभूमीवर, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ ही प्रखर निदर्शने ''महाराष्ट्र किसान सभे''च्या बिरुदाखाली करण्यात आली.



यावेळी उपस्थित आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे पुढे म्हणाले की, ''ज्याप्रमाणे उंदीर, सारखं काही ना काही कुरतडत असतो, तसेच या व्यवस्थेचे हात तुमच्या खिशाला, तुमच्या पैशाच्या पाकिटाला कुरतडत, ओरबाडत असतात... आणि, म्हणूनच या व्यवस्थेला मी 'रक्तपिपासू शोषक-व्यवस्था' म्हणतो. **या व्यवस्थेचे जे सगळे बगलबच्चे आहेत, ते कसलेल्या 'पाकिटमारा'सारखे आपल्या खिशात हात घालून असतात, आपल्याला ते कळत नाही. एकीकडे उड्डाणपूल होतायत, मॉलटॉल होतायत, विकासकामं होताना दिसतायत, पण आमच्या पगाराची पाकिटं कधी जाडजूड होताना दिसतात का? आम्ही मात्र, अजूनही टेकड्यांवर आणि त्यांची प्रगती हिमालयाच्या उंचीएवढी. म्हणूनच, आमचं जीवन खाली-खाली घसरत चाललंय... ना आम्हाला आरोग्यसेवा परवडत, ना आम्हाला खासगी शिक्षण परवडत. शिक्षणसेवा आणि आरोग्यसेवा या खासगी असूच कशा शकतात?''** असा प्रश्न उपस्थित करीत, राजे पुढे म्हणाले, ''ज्याला आम्ही 'कल्याणकारी राज्य' म्हणावं, त्याचा अगदी उलट हा कारभार सुरु आहे. आरोग्य व शिक्षण या सकस, दर्जेदार सेवा सरकारतर्फेच पुरविल्या गेल्या पाहिजेत. जोपर्यंत, आपल्या देशात 'कल्याणकारी राज्य' संकल्पनेची धारणा व धोरणं होती, तोपर्यंत, मूलभूत सुविधा सर्वसामान्यांना समाधानकारक मिळत होत्या, पण आता भाजपा-नरेंद्र मोदी सरकारच्या बेलगाम खाजगीकरणाच्या, खरं म्हणजे 'अदानी-अंबानीकरणा'च्या, गेल्या दहा वर्षांच्या लोकशाहीविरोधी कालखंडात सगळंच बदललंय. मी तुम्हाला ठामपणे सांगतो, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले काय, फडणवीस झाले काय आणि पवार झाले काय, आपले मूलभूत प्रश्न कधिही सुटणे नाही... ही व्यवस्थाच आपल्याला मुळातून आमूलाग्र बदलायला हवी. **तुम्ही सुशिक्षित आहात, तुम्ही स्वतःच तपासून पाहा, अमेरिकेत-युरोपात आता, समाजवादी-साम्यवादी चळवळी जोर धरु लागल्यात. ज्याला आपण समाजवाद व साम्यवादाचा विचार म्हणतो, तो पुन्हा जोरकसपणे पुढे यायला लागलाय. आता फक्त आंदोलनापुरते सीमित न राहता, राजकीयदृष्ट्या सुशिक्षित होणे गरजेचे आहे. तुम्ही आम्ही एकाच चळवळीतील लोकं आहोत, आपण वेळीच जागे झालो नाही तर, राजकीयदृष्ट्या अज्ञानी माणसाला, या पुढारलेल्या आणि विज्ञानवादी जगात कुठलाही थारा मिळणार नाही!'' अशा रोखठोक भाषेत, उपस्थित शेतकरी आणि कंत्राटी-कर्मचाऱ्यांना राजन राजे यांनी, आवाहन केले.**

---

कोलरॅडो, लुझियाना, इलॅनॉईस यांच्या पाठोपाठ मेन (Maine) हे अमेरिकन राज्य बंदुकीतून गोळीबाराच्या सामूहिक-हत्याकांडांचं (Mass-Shooting) लक्ष्य बनलंय... जवळपास ३२ जण ठार व ६० पेक्षा अधिक लोकं जखमी झालेत. या वर्षाला संपायला अजून दोन महिन्यांहून अधिक काळ शिल्लक असताना, हे एकूण ५६५ वे सामूहिक-हत्याकांड घडलंय, याचाच अर्थ, वर्ष-२०२१चा अशा एकूण ६८६ घटनांचा काळा-विक्रम या वर्षी मोडला जाऊ शकेल, अशी गंभीर स्थिती आहे. **आजवर दरदिवशी १२० या हिशोबाने ४३,३७५ अमेरिकन माणसं, दरवर्षी बंदुकीच्या गोळीबारात मारली जातात. तरीही, अनिर्बंध बंदुकीच्या वापरावर कडक निर्बंध घालण्याची, कुणा एका अमेरिकन अध्यक्षाची हिंमत होऊच शकत नाही... एवढी, 'भांडवलदार' अमेरिकेतल्या 'भांडवली-व्यवस्थे'तील बंदूक-उत्पादकांची संघटना शक्तिशाली आहे. अमेरिकेतील शस्त्रास्त्र-निर्मिती करणारे**

> **Rajan Raje - राजन राजे** ... · 19s
> With Maine 565th mass shooting incident this year & 120 people dying every day of gun-violence in US, if US can't control it's own Gun-Lobby: then, with powerful Jewish-Lobby, you expect it to control 'trigger-happy' Israel, terrorising not only Palestinians, but even UN Chief?

**लॉकहिड-मार्टिन, रेथॉन टेक्नॉलॉजिस, बोईंगसारखे बडे बडे कारखाने चालावेत म्हणूनच, जगातली युद्धे, कधिच थांबू शकत नाहीत... कारण, वेळोवेळी ढासळणारी अमेरिकन-अर्थव्यवस्था सावरुन धरण्याचं तथाकथित 'महत्कार्य' या कंपन्या, परंपरागतरित्या करत आलेल्या आहेत.**

'लोकशाही-राज्या'चा व जगातील मानवी-हक्कांच्या संरक्षणाचा खोटा मुखवटा धारण करणाऱ्या, तमाम अमेरिकन भांडवलदारवर्गाचा हा आत्यंतिक क्रूर, हिडीस व अमानुष असा खरा चेहरा आहे!

पल, अमेझॉन, मायक्रोसॉफ्ट, वॉलमार्ट, फेसबुक, टेस्ला, गुगल (अल्फाबेट) सारख्या महाकाय अमेरिकन-कंपन्यांची, जी कॉर्पोरेटीय-क्षेत्रात भयंकर दहशतवादी दादागिरी (Corporate-Terrorism) जगभरात सर्वत्र चाललेली आहे... ती जगभरातल्या नामचीन दहशतवादी-संघटनांनासुद्धा मान खाली घालायला लावेल आणि हीच अमेरिकन लोकं, साम्यवादी (कम्युनिस्ट) देशांमधील मानवी-हक्कांना पायदळी तुडवलं जाण्याबाबत, गेली कित्येक दशके कोल्हेकुई करत आलेली आहेत... पण, वर्ष-१९९१मध्ये सोव्हिएत रशिया कोसळल्यानंतर व डेंग झिओपिंग यांच्या नेतृत्त्वाखाली चीनने भांडवली-अर्थसुधारणा (Economic-Reforms) हाती घेतल्यानंतर... जगभरातलं साम्यवादाचं (कम्युनिझमच) आव्हानच संपुष्टात आल्यावर, या अमेरिकन भांडवली-व्यवस्थेतल्या लोकशाहीचा भेसूर, हिंसक खरा चेहरा आता जगाला दिसू लागलाय... व्हिएतनाम-अफगाण युद्धातला पराभव व त्यातील अमेरिकन मनुष्यहानी तसेच, ९/११चा अमेरिकेवरील आतंकी हल्ला आणि अशी सामूहिक-हत्याकांडाद्वारे वगैरे बंदुकीतून किडामुंगीसारखी मारली जाणारी अमेरिकन माणसं, ही अमेरिकन 'विषवृक्षा'ला लागलेली कटू फळं आहेत... त्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या पातकांची सजा आहे!

तेव्हा, मूळ मुद्द्यावर येताना, जर शक्तिशाली बंदूक-उत्पादकांची अमेरिकन संघटना (Gun-Lobby), अमेरिकन सरकार नियंत्रणात आणू शकत नाही... तर, पॅलेस्टाईनींच्या ऊरावर, त्यांच्या क्रूर हत्या करुन व त्यांना त्यांच्या रहात्या घरांतून हुसकावून लावून जबरदस्तीने वसवल्या व वाढवल्या गेलेल्या, माणुसकीचा वैरी असलेल्या क्रूर-हिंसक इस्रायलला... त्यांची अतिश्रीमंत व राजकीयदृष्ट्या प्रचंड शक्तिमान असलेल्या अमेरिकन ज्यू-यहुदी अमेरिकन संघटना (Jewish-Lobby) चोवीस तास सज्ज असताना, अमेरिकन-सरकार काय अटकाव करणार...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ठाणे शहराची वाट लावण्यात एकनाथ शिंदेंचा हात !

**• राजन राजे यांचा मुख्यमंत्र्यावर जोरदार हल्लाबोल • पोलिसांच्या बोनसप्रकरणी 'धर्मराज्य पक्षा'ची आक्रमक भूमिका**

**हजारो कोटींचे प्रकल्प उभारण्यासाठी हवा तेवढा पैसा, पण जनतेच्या सेवेसाठी आणि नेत्यांच्या संरक्षणासाठी दहा-बारा तास उन्हातान्हात-पावसापाण्यात राबणाऱ्या मायमराठी पोलीस बंधू-भगिनींना सन्मानजनक बोनस देण्यासाठी मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या शासनाकडे पैसा नाही!**




शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच, महाराष्ट्र पोलीस दलातील कर्मचाऱ्यांनाही, दिवाळी बोनस देण्यात यावा, यासाठी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, गुरुवार, दि. ९ नोव्हेंबर-२०२३ रोजी, ठाण्यात जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली जोरदार निदर्शने करण्यात आली. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या पोलीस महासंचालकांना, दि. ०३/१०/२०२२ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यापार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यालयाच्यावतीने, पोलीस उप-आयुक्त तेजस्वी सातपुते यांनी, दि. ३०/०६/२०२३ रोजी, पाठविलेल्या उत्तरादाखलच्या पत्रात, **''आमच्या कार्यालयाकडून, पोलिसांच्या दिवाळी बोनससंदर्भात, शासनास विनंती करण्यात आलेली आहे; मात्र, शासनस्तरावर निर्णय प्रलंबित आहे'' असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. सणासुदीच्या काळात आपल्या कुटुंबाला वेळ देऊ न शकणारे आणि आपत्कालीन प्रसंगी, आपल्या प्राणांची पर्वा न करता, महाराष्ट्रीय नागरिकांचे संरक्षण करणारे पोलीस कर्मचारी, आपल्या हक्काच्या बोनसपासून वंचित राहिलेले आहेत. ही बाब अत्यंत दुर्दैवी असून, याचाच निषेध करण्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ही निदर्शने करण्यात आली. यावेळी आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर घणाघाती टीकास्त्र सोडताना, राजन राजे म्हणाले की, ''हा महाराष्ट्र नक्की कुणाचा? अशी परिस्थिती सध्या निर्माण झालीय. हा महाराष्ट्र जैन-गुजराती-मारवाडी धनदांडग्यांचा की, मायमराठी मराठ्यांचा?** महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसाने आता, आपले हितशत्रू कोण याचा शोध घेतला पाहिजे. आम्ही आरक्षणासाठी लढतो पण, आमच्या लक्षातच येत नाहीये की, आमचं जगणंच या लोकांनी मुश्किल करुन ठेवलंय. शहरं आणि उपनगरांतून आम्हाला नाकारलं जातंय, आमचं अस्तित्व पुसलं जातंय... या ठाणे शहराचा विकास तुम्ही पाहिलात, काँक्रीटची उभी राहिलेली ही एकेक बांधकामं बघा, सुखसोयी बघा, पंचतारांकित बगीचे बघा, कोणासाठी चाललंय हे? मी, 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन कायमच सांगत असतो, 'टॉवरमध्ये आता, अमराठींचा वावर... दहा बाय दहामधल्या मराठी माणसा आता तरी सावर' आपल्याला हे ओळखता आलं पाहिजे, कोणी केला हा विकृत विकास? गणेशोत्सव-नवरात्रौत्सव असो, दिवाळी असो किंवा उद्याचा नाताळ असो, पोलीस कायमचे आठ-आठ तास नव्हे; तर, बारा-बारा तास तुमच्या आमच्या संरक्षणासाठी उन्हातान्हात-पावसापाण्यात धावत असतात आणि तुम्ही त्यांचा हक्क नाकारताय? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतःला या ठाण्याचे म्हणवतात; पण, ते



मूळचे ठाणेकर नव्हेत. या ठाण्यावर त्यांचं प्रेम असण्याचा प्रश्नच नाही. ते या ठाणे शहरात, राजकारणाचा धंदा करायला पश्चिम महाराष्ट्रातून आलेले आहेत. **या ठाणे शहराची जी काही वाट लागलीय, त्यात याच एकनाथ शिंदेंचा हात आहे. त्यांनी आम्हाला गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सवाच्या पूजेत अडकवले, त्यांनीच आम्हाला गरबे नाचायला लावले, तुम्हीच या ठाणे शहराची वाट लावलीत. तुमची आम्हाला लाज वाटतेय!'' असा जोरदार घणाघात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांवर केला.**

दरम्यान, कोरोना संसर्गकाळात, पोलिसांनी आपल्या जीवाची बाजी लावली होती. कोव्हिडसारखे जिवितावरील संकट असो, राज्यात उद्भवणारी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती असो, पोलिसांनी नेहमीच छातीचा कोट करुन, सर्वसामान्य कष्टकरी नागरिकांचे संरक्षण केलेले आहे. **आपल्या न्याय्य-हक्कांसाठी, पोलीस कर्मचाऱ्यांना 'युनियन' स्थापन करुन, संघटनात्मक लढा देण्याची कायदेशीर परवानगी नसल्यानेच, महाराष्ट्र पोलीस दलातील हा योध्दा, आज निमुटपणे आपल्यावरील अन्याय सहन करीत आहे. या माध्यमातून महाराष्ट्र शासनाची उदासीन भुमिकाच ठळकपणे अधोरेखित होत असल्याची रोखठोक टीका 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना केली. यावेळी थेट मुख्यमंत्र्यांचा उल्लेख करुन पुढे बोलताना राजे म्हणाले, ''एकनाथ शिंदे, आम्ही तुम्हाला ठामपणे सांगतो, या ठाणे शहरातून तुम्ही निवडून येता. याच ठाण्यातून तुम्ही आमदार बनलात आणि पुढे मुख्यमंत्रीही झालात... आज आमच्या पोलीस बांधवाना तुम्ही दिवाळी बोनस नाकारताय, त्यांना बोनस द्यायला तुमच्याकडे पैसे नसल्याचं सांगताय. ठाणे हे एकेकाळी तलावांचं शहर म्हणून ओळखलं जात होतं, त्याच ठाणे शहरात आज ६५ मजली इमारती उभ्या राहतायत. तुमच्याच सगळ्या भागीदार बगलबच्चे, बिल्डर्स यांनी काँक्रीटचे ठोकळे उभे केले, त्यासाठी तुमच्याकडे पैसा कसा आणि कुठून आला? पोलिसांना बोनस देता येत नसेल तर, मुख्यमंत्री महोदय तुमची खुर्ची खाली करा.** 'धर्मराज्य पक्षा'चा अध्यक्ष आणि या ठाणे शहराचा मूळ नागरिक या नात्याने सांगतोय, या ठाण्याला विकृत तुम्ही केलंत, या मराठमोळ्या ठाणे शहराला जैन-गुजराती-मारवाडी धनदांडग्यांच्या हाती तुम्हीच विकलंत. मात्र, आम्ही आता यापुढे वंचितांचं जिणं जगणार नाही, कोणत्याही परिस्थितीत पोलिसांना दिवाळी बोनस मिळालाच पाहिजे; अन्यथा, आम्हाला आमरण उपोषण करावं लागेल. पोलिसांना तुम्ही मुके-बहिरे असल्यासारखं वागवत असाल; तर, ते आम्ही सहन करणार नाही. पोलिसांना बोनस देताय की नाही ते सांगा, नाहीतर आमच्या मोर्चाला सामोरे जा. तुमच्या राहत्या घरावर मोर्चा काढू, काय लाठीमार करायचाय तो करा!'' अशा शब्दांत राजन राजे यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. दरम्यान, लोकशाही आणि सनदशीरमार्गाने करण्यात आलेल्या या निषेध आंदोलनात, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष नरेंद्र पंडित व सचिन शेट्टी, ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे, ठाणे शहर अध्यक्ष जगन्नाथ सलगर, ठाणे संघटक अजय जेया, ठाणे शहर सचिव दिनेश चिकणे, कामगार प्रतिनिधी समीर चव्हाण, अविनाश सावंत, मोहन गंभीर आदी पदाधिकाऱ्यांसह, मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी, पोलिसांच्या दिवाळी बोनसबाबत, शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, या मागणीसंदर्भात पक्षाच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना निवेदन देण्यात आले.

# दारिद्र्याची व्याख्या...

सर, तुम्हाला काय सारखा त्या गरिबांचा कळवळा येत असतो; आता गरीब पूर्वीसारखे गरीब नाही राहिलेत, मुंबईच्या तथाकथित झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन बघा...

घराघरात मोटरबाईक, स्मार्टफोन, फ्रीझ, टीव्ही, गिझर आणि काहींच्याकडे एअर-कंडिशनर देखील लागलेत; राहतील अगदी छोट्या खोल्यात, पण सगळे काही ठासून भरलंय त्या छोट्या घरात.

जर, गेल्या काही वर्षात एवढ्या लोकांकडे एवढी गॅजेट्स आली आहेत; तर, उरलेल्या गरिबांकडे देखील येतीलच ना?

**तुम्ही आपले त्यांना गरीब गरीब म्हणतात; मग, ती लोक चढून बसतात आणि सरकारकडून अजून काहीबाही फुकटात पदरात पडून घेतात. माझा एक विद्यार्थी देशातील दारिद्र्य, या विषयावरील लेक्चरनंतर मला सल्ला देत होता**

अर्थशास्त्राचा / डेव्हलपमेंट इकॉनॉमिक्स व तत्सम विषयाचा काही अभ्यास नाही, वाचन नाही आणि असे तारे तोडणारे अनेकानेक भेटत असतात; विद्यार्थीच नाही तर, अगदी मध्यम वर्गीय प्रौढ माणसेदेखील

त्यातील, बहुसंख्य स्वतः किंवा त्यांचे वडील अतिशय हलाखीत / चाळीत / निम्न मध्यमवर्गीयात वगैरे वाढलेले असतात; त्यामुळे त्यांच्या गरिबीतून बाहेर येण्याच्या कल्पना टीव्ही / फ्रीझ/ स्मार्टफोन असणे किंवा नसणे यापुढे जात नाहीत

अनेकांना आजच्या गरीबांमध्ये आपल्या भूतकाळाचे प्रतिबिंब दिसते; त्यातून एकप्रकारचा दुस्वासदेखील असतो.

**आपल्या देशात दारिद्र्य रेषेची व्याख्या, दिवसाला किती कॅलरीज शरीराला मिळाल्या, अशा संकुचित व्याख्येपासून सुरुवात झाली; गाईने किंवा म्हशीने अमूक एक लिटर्स दूध देण्यासाठी तिला किती किलो चारा खायला घालायला पाहिजे, या धर्तीवर अशा व्याख्या बनतात**

माणूस म्हणजे स्वप्ने, माणूस म्हणजे आशाआकांक्षा, माणूस म्हणजे स्वतःचे सुखी कुटुंब तयार करणे, माणूस म्हणजे आपल्या पोटच्या मुलांना राजा किंवा राणी बनवणे, त्यासाठी खस्ता खाणे, माणूस म्हणजे सर्व प्रकारचा उपभोग किमान चाखावासा वाटणे, मौजमजा कराविशी वाटणे... अशी व्याख्या केली तर?

हे तर खूप पुढचे राहिले; पण गरिबीच्या, दारिद्र्याच्या संकल्पनेवर अजून अजून चर्चा घडवून आणल्या पाहिजेत

दारिद्र्याच्या व्याख्येमध्ये खालील निकषांचा समावेश का नाही?

गरीब कुटुंबात एका चौरस मीटरमध्ये किती सभासद कोंबून राहतात?



गरिबांपैकी किती गरिबांची मालकीची घरे आहेत / आणि भाडेतत्वावर किती जणांची?

गरीब कुटुंबात लग्न झालेल्या / तरुण-तरुणींना प्रायव्हसी किती मिळते?

गरीब कुटुंबे शौच कुठे करतात?

गरीब कुटुंबातील दरडोई पाण्याची उपलब्धता किती?

ते जेथे राहतात तेथे सांडपाणी, घनकचरा आणि हवेची गुणवत्ता काय असते?

**गरीब कुटुंबाच्या मासिक मिळकतीपैकी किती टक्के रक्कम वीजबिल, टँकर पाणी, सार्वजनिक वाहतूक यावर खर्च होते?**

**स्त्रियांच्या शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण किती?**

**गरीब कुटुंबातील सभासदांचा बॉडीमास रेश्यो?**

मध्यम / उच्च मध्यमवर्गीय कुटुंबाच्या तुलनेत, गरीब घरातील सभासदांचे सरासरी आयुर्मान घरातील शिक्षणाचे प्रमाण; घरात अभ्यास करावासा वाटेल असे वातावरण, अभ्यासाला जागा?

गरीब कुटुंबातील माणसे म्हातारी झाली, हातपाय थकले तर, ते कोणावर अवलंबून असतात?

गरीब कुटुंबातील कर्जबाजारीपणा वाढता आहे का की, कमी होतोय; एकाच वेळी किती जणांकडून ते कर्जे घेतात?

**ही तर, वानगी दाखल यादी आहे.... दमछाक होईल गरिबीच्या / दारिद्र्याच्या अशा निकषांची यादी करायची म्हटली तर! हातभार फाटेल; फाटेल हे माहीत असल्यामुळे कोणत्याही सर्व्हेत, या निकषांचा समावेशच नसतोच... असलाच तर फक्त परिघावर घुटमळत. कारण, सत्तेवर कोणताही पक्ष असो आणि कोणीही पंतप्रधान; आपल्या राज्यात दारिद्र्य रेषेच्याखाली असणाऱ्यांची संख्या घटत आहे, हे आणि हेच, त्याला सिद्ध करायचे असते .**

दारिद्र्य रेषेचे निकष तर तुम्ही देखील काढू शकता, अट एकच.

अट एकच; जसे जंगलात सिंह, हत्ती, हरीण असे प्राणी असतात... तशाच धर्तीवर, मानवी समाजात श्रीमंत, मध्यम वर्गीय, गरीब असे प्रकार नसतात, नसलेच पाहिजेत; या मानवी-मूल्यावर विश्वास हवा...!!!

अट एकच स्वतःशी / स्वतःच्या भौतिक आकांक्षांशी प्रामाणिक राहून, मगच गरीबांकडे बघायचे...

***...संजीव चांदोरकर*** (२३ नोव्हेंबर २०२३)







भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी हरित-पक्ष अशी सर्वमान्य ओळख असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'चा १२वा वर्धापनदिन, दि. १६ नोव्हेंबर-२०२३ रोजी, पक्षाच्या ठाणे कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हौतात्म्य पत्करलेल्या १०६ मराठी हुतात्म्यांचे स्मरण करुन, 'धर्मराज्य पक्षा'च्या कार्यालयात असलेल्या हुतात्मा स्मारकाच्या प्रतिकृतीस पुष्पहार अर्पण करुन, विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, महासंघाचे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासंघाचे खजिनदार श्री. अजित सावंत, पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. नरेंद्र पंडित, सचिव श्री. विनोद मोरे, ठाणे शहर सचिव श्री. दिनेश चिकणे, कामगार प्रतिनिधी श्री. समीर चव्हाण, कार्यालयीन कर्मचारी श्री. संजय दळवी, श्री. सोपान चौधरी, सौ. मनीषा सांडभोर, सौ. भावना ओरपे आदी पदाधिकाऱ्यांसह, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे कार्यकारिणी सभासद आणि कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

**ठाणे शहरातील 'शिवदूत सामाजिक प्रतिष्ठान' या सेवाभावी संस्थेच्या वतीने, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर, दिव्यांग बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. गुरुवार, दि. ९ नोव्हेंबर-२०२३ रोजी, ठाणे महानगरपालिका मुख्यालयासमोरील, कचराळी तलावाच्या उद्यानात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. दिव्यांग बांधवांना मदतीचा एक हात पुढे करुन, 'शिवदूत' संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रदीप शिंदे यांच्या वतीने, १०० दिव्यांगांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, मा. राजन राजे यांनी, सद्य राजकीय परिस्थितीवर सडेतोड भाष्य करुन, प्रस्थापित भांडवलदारी व्यवस्थेवर एकच शरसंधान साधले.** बौद्धिक आणि वैचारिक अपंगत्व असलेले लोक सत्तेत असल्यामुळेच, आज देशात अराजक माजले आहे. त्यामुळे आपणा सर्वांमध्ये एकोपा आणि राष्ट्रीय भावना व राजकीय समज असणे ही, काळाची गरज असल्याचे रोखठोक सूतोवाच मा. राजन राजे यांनी यावेळी केले. दरम्यान, या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव श्री. चंद्रभान आझाद, शिवक्रांती सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष श्री. मुकेश घोरपडे, सचिव श्री. अभिजित शिंदे, शहर अध्यक्ष श्री. नितीन जगदाळे, प्रहार दिव्यांग संघटनेचे श्री. मंगेश साळवी, अखिल भारतीय दिव्यांग सेनेच्या अध्यक्षा श्रीमती शबनम खान आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.





# आधुनिक रक्तपिपासू-शोषक भांडवली-व्यवस्थेच्या 'बकासुराचा प्राण'...

विविध कामगार-संघटना आणि 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन गेली दोनतीन दशके आम्ही सातत्याने, 'खाउजा' (खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण) धोरणापश्चातच्या आधुनिक रक्तपिपासू-शोषक भांडवली-व्यवस्थेच्या (Vampire-State System) 'बकासुराचा प्राण'... 'कंत्राटी-कामगार पद्धत, आऊटसोर्सिंग'सारख्या अमानुष-घृणास्पद शोषण करणाऱ्या, भांडवली-गुहेमध्ये दडलेल्या 'पिंजऱ्यातील पोपटा'त आहे... अशी मांडणी करीत आलेलो आहोत!

'नफ़रत छोड़ो, भारत जोड़ो'चे प्रणेते व 'भाजपा-संघ'कृत ''विद्वेषी बाजारात प्रेमाचं दुकान'' उघडणारे व अन्याय-अत्याचार-शोषणाग्रस्त जनसामान्यांच्या भळभळत्या जखमांवर हळुवार प्रेमाची फुंकर घालणारे, राहुल गांधी जेव्हा, हेच प्रतिक वापरतात, तेव्हा त्याचं 'धर्मराज्य पक्षा'ला फार मोठं अप्रूप वाटणं, स्वाभाविकच आहे...

''परदेशातला काळा पैसा बेकायदेशीररित्या भारतात आणणे (Money Laundering), कोळसा-घोटाळा, कृत्रिमरीत्या शेअर्सच्या किंमती वाढवणं, SEBI/ED/IT/DRI/CBI सारख्या सरकारी-यंत्रणांवर बेकायदेशीर दबाव टाकणे, विरोधी राजकीय नेत्यांना धमकावणे अथवा लाच देण्याचा प्रयत्न करणे आणि ताजा आरोप म्हणजे, परदेशातील बेनामी कंपन्यांमधील पैसा आपल्या उद्योगसमूहात लावणे''... असे एकेक भयंकर मोठे आरोप असणाऱ्या 'गौतम अदानी' नावाच्या 'पोपटा'तच, भारताच्या 'शहेनशहा'चा आत्मा किंवा प्राण दडलेला आहे''... हे राहुल गांधी यांनी, नुकत्याच पार पडलेल्या त्यांच्या पत्रकार-परिषदेत जाहीर केलं... त्याबाबतचं, समाजमाध्यमातील अत्यंत बोलकं व विलक्षण प्रभावी 'अक्षरचित्र', समाजमाध्यमांप्रति आभार व्यक्त करुन वाचकांप्रति सादर...!!!

**...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*आधुनिक हिंदुस्थानच्या बाद'शहा'च्या ७३ वा वाढदिवस भव्यदिव्य साजरा करुन दाखवण्यासाठी, ''गुजराथी बादशहाच्या गुजराथी चमच्यांकडून''... लाखो हेक्टरवरील सोयाबीन, कापूस आणि मक्याची पिकं उभ्या उभ्या उध्वस्त करण्यात आलीत!*

*आपत्ती 'निसर्गनिर्मित' नव्हती; होती, स्वार्थ आणि संवेदनशून्यतेतून 'मानवनिर्मित' झालेली. आभाळ आधी फाटलं होतं खरं, पण एवढंही फाटलं नव्हतं की, गुजराथ-मध्यप्रदेशच्या हजारो शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून नेईल... फाटलं होतं ते, त्यांचं नशीब; कारण, ''राजाने मारलं आणि पावसाने झोडपलं'', तर निर्दयतेच्या या कहरासंदर्भात, दाद मागायची तरी कुणाकडे???*

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

नॅशनल जिओग्राफिक, CRY, Child उरीश अशा अनेक संस्था, सोशलमिडीयावर असे फोटो टाकून, दोन-चार ओळींचं 'कॅप्शन' टाकत असतात...

गरीब, शहरी किंवा ग्रामीण भागात प्रौढ माणसांसारखे कष्ट करणाऱ्या, लहान मुलगे-मुली यांचे फोटो टाकायचे. मध्यमवर्गीय-अपराधी गंड, त्याला आवाहन करायचे, तुम्ही देणगी दिलीत तर, त्यांचे आयुष्य थोडे तरी सुधारेल म्हणून म्हणायचे... चार आणे, आठ आणे रकमेच्या देणग्या गोळा करायच्या. अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय-कॉर्पोरेट NGOs हे मिशन चालवतात!

खरेतर, जगातील कोट्यवधी लहान मुलांचे बालपण कायमचे करपून टाकणाऱ्या, प्रौढ झाल्यावर त्यांना चाळिशीमध्ये मृत्यू आणणाऱ्या या, 'फिनॉमिनन'ची मुळे राजकीय अर्थव्यवस्थेमध्ये आहेत. त्याबद्दल या कॉर्पोरेट NGOs चकार शब्द काढत नाहीत...

अशा देणग्या गोळा करुन, जगातील फक्त ०.०००१ टक्के मुलांचे प्रश्न अंशतः धार थोडीफार... तीदेखील, काही काळापुरती बोथट करता येऊ शकते, हे या सुटेड-बुटेड 'कॉर्पोरेट NGO'वाल्यांना काय माहित नाही?

शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक आरोग्य अशा सामाजिक पायाभूत सुविधांवर एक चकार शब्द बोलत नाहीत. आई-वडिलांना चांगलंचुंगलं किमान वेतन मिळाले तर, जगातील कोणते आई-वडील आपल्या पोटच्या पोराला काम करायला पाठवतील? 'किमान वेतन', आमदनीबद्दल चकार शब्द काढायचा नाही... या 'कॉर्पोरेट NGOs'नी कोणाची सुपारी घेतलेली असते, हे आकळणे म्हणजे, राजकीय विचार करणे...!!!

*....संजीव चांदोरकर*

# “महाराष्ट्र टाइम्सचा वैचारिक गर्भपात”...

**महाराष्ट्र टाईम्स, हे एक जबाबदार वृत्तपत्र असून त्यातील बातमी लोक खरी समजतात. अशिक्षित गुन्हेगारांनी केलेला गुन्हा व भरतकुमार राऊत/व्हनमाने सारख्या सुशिक्षित, विचारवंतांनी जाणिवपूर्वक केलेला गुन्हा, यात फरक केला पाहिजे. अशा खोट्या बातम्या पेरल्याने, पोलीस खात्यात इमानेइतबारे काम करणाऱ्या कितीतरी अधिकाऱ्यांचं करिअर उध्वस्त झालं आहे. ते पुन्हा घडू नये म्हणून... आरोपींना कसलीही दयामाया न दाखवता कडक शिक्षा देण्यात यावी. कोर्टानं माझं म्हणणं नोंदवलं, मान्य केलं आणि शिक्षा सुनावली.**

**मित्र हो, IPS श्रीधर वगळ म्हणजे खरोखरच हुशार अधिकारी. कमी वयात IPS झाल्याने त्यांना मुंबई कमिशनरपदाची/महासंचालक होण्याची भरपूर संधी होती. पण, त्यांच्या पाठी लॉबी काय उचापती करते, हे त्यांना कळले नसावे. कारण इथे मराठी IPS ला मंबई कमिशनर पदावर बसवतांना प्रचंड अडथळे उभे केले जातात. बदनाम करण्याची संधी शोधली जाते, तयार सुद्धा केली जाते. मग तो अधिकारी, पुढारी ‘शरणम’ करतो... आणि, मग पुढारी आपली वसुली पाहिजे, तशी करतातच (पुणे कमिशनर गुलाबराव पोळ, याचे उत्तम उदाहरण)... असो.**

IPS वगळ यांनी मला अंतिम सांगावा धाडला. ऑफिसमध्ये मी हजर झालो. म्हणाले, ‘‘क्या करताय तुम! आं! मेरे उपर बहोत प्रेशर है. तुम जरा ठंडा हो जाओ... आणि बरच काही... फुल्या फुल्या फुल्या... कुछ धंदे की बात सुद्धा! मी स्पष्ट नकार दिला. असं ऐकायची सवय नसते त्यांना... मी पुन्हा तुमच्या ऑफिसमध्ये येणार नाही म्हणून ठणकावलं. सॅल्यूट केला, वळलो तर दार उघडत नव्हतं. मागून अस्फूट हसल्याचा आवाज... आणि खट्ट आवाज... दाराचे लॉक आपोआप उघडले. माझ्या लक्षात आले, मुंबईच्या जॉईंट कमिशनर, क्राईम यांनी दाराला रिमोटचे लॉक बसवले होते. मुंबई पोलीस इतिहासात हे प्रथमच घडले होते... का बुवा? विचार करत करत मी बाहेर पडलो; थबकलो, मनात हसलो; मला उत्तर सापडलं होतं.

IPS अर्चना त्यागींची बदली झाली आणि त्यांचे जागी IPS सुरेंद्र पांण्डेय आले होते. ते ए.के. जैन यांचे गाववाले. त्यांनी दमातच घ्यायला सुरुवात केली! म्हणाले ‘‘आमची परवानगी घेतल्याशिवाय माफियावर रेड करायची नाही. त्यांनी सुलतानी थाटात फतवाच काढला. आता मात्र, मी आतल्या आत पेटून उठलो. मनात म्हटलं, मी पोलीस इन्स्पेक्टर... कायद्यानं दिलेले अधिकार वापरुन मी माफियांना जेरीस आणतोय. पांडेय म्हणतात, त्यांना विचारल्याशिवाय कायदा राबवायचाच नाही... हे कुठल्या पुस्तकात लिहिलंय बुवा? मलाही अधिकार आहेत. मी रेड करतो, त्याचा अहवाल वरिष्ठांना लगेच पाठवतो. त्यांनी तपासून रिमार्क द्यायचे असतात. मी पाठवेन ना, लिहा मग त्यावर जे लिहायचे ते. पण रेडच करायची नाही! हे अतीच झाले. त्यांना आधी सांगायचं, मग ऑफिस मधून खबर लीक् झाली तर? आणि ती होतेच की! मग रेड फेल, माफिया खूष, समीर खूष. यांची पोस्टिंग पक्की मुंबईतच. मी ठामपणे उत्तरलो, सॉरी सर, मी रेड करणारच...!!! ठणकावून सांगितलं! त्यांना हे उत्तर अपेक्षित नव्हतंच. सवयच नाही त्यांना. त्यांनी गुर्ररर्र केलं की, समोरच्यांनी फक्त म्यॉंव करायचं... याचे नाव IPS! आणि तेच, माझ्या रक्तात नव्हतं. त्यांनी गुर्र्रर केलं की मी सरळ सरळ डुर्ररर्रर करायचो. इथेच वांधा व्हायचा, असो.

छगनराव नाराज. समीर भुजबळ बेजार. IPS वगळ परेशान. त्यात ही आणखी एक भर पडली. म्हटलं बघू या काय वाढून ठेवलय पुढे. समोर आल्यावरच अंदाज येईल. IPS ए.के. जैन यांच्याविरुद्ध केस करुन माझी मानसिक हिंमत थोडी वाढली होतीच. अन्यायाविरुध्द लढण्याची भिती आता संपली होती. त्यांच्याही पायाला माती लागलेली दिसत होती. मी निर्धास्त होतो. केसेस करीतच होतो.

या दरम्यान, मुंबईत मोठ मोठ्या इमारती उभ्या रहात होत्या. त्याला लागणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या स्टीलमधून काही भाग चोरणारी टोळी कार्यरत झाली होती. मला खबरी भेटत होते... मी रेड करुन कंबरडं मोडत होतो. बिल्डरला फरक पडत नव्हता; पण, नुकसान ग्राहकच भरणार ना? आता CB Control शाखेची भिती माफियांना वाटत होती. धसकाच घेतला होता त्यांनी. सगळीकडे अस्वस्थ शांतता नांदत होती. वादळापूर्वीची म्हणा ना... वरिष्ठांनी सर्व बाजूंनी माझ्यावर पाळत ठेवली होती. कनिष्ठांना / सहकाऱ्यांना दम दिले... कोकीळबरोबर कोणीही रेड करायला जायचं नाही. सगळे कनिष्ठ घाबरुन गेले. मला टाळायला लागले. माझ्यापासून दूर होऊ लागले. साहेब, तुमच्या बरोबर बोलताना दिसलो तरी, आम्हाला दम मिळतो. आता वरिष्ठ निरिक्षक म्हणून राजे भोसले आणले गेले. ते वगळ यांच्या खास मर्जीतले. त्यांनाही माझी कोंडी करण्याचे फर्मान होते. त्यांनी बाकी स्टाफला दम भरायला सुरुवात केली.

**माझी हतबलता वाढीस लागली... खबर यायची, पण स्टाफ यायला तयार नव्हता. मला जीपसुद्धा देत नव्हते. मी निराश होत होतो. वरिष्ठांचा अगम्य खेळ पाहून वर्ष २००२, दिवाळी, शासकीय सुट्या! दिवाळी कुटुंबात घालवावी, असा मनसुबा केला. पण DCP पाण्डेय यांनी फतवा काढला, सर्व स्टाफने शाखेत हजर रहावे, मी पेपर्स तपासणार... पण ते आलेच नाहीत! सगळ्यांची दिवाळी केरात गेली, विरस झाला, दुष्टपणाचा कळस झाला. सणासुदीचा आनंद कनिष्ठांना मिळू द्यायचा नाही, असे वागणारे सुद्धा IPS असतात (सगळे नाही), हे मी स्वत: अनुभवले. त्यामुळे, अशा अधिकाऱ्यांबद्दल मनात तिरस्कारच निर्माण झाला... पण, मांजराच्या गळ्यात घंटी बांधणार कोण?**

पण, मी मात्र ठरवले; डुर्रर र करणार. त्यानंतर एक खबर आली आणि मी माफियावर साकीनाका येथे रेड केलीच. पहाटे DCP पाण्डेय यांना रिपोर्ट देखील केला. सकाळी घरी जाऊन झोपलो. DCP पाण्डेय संतापले होते. ज्याच्यावर मी रेड केली होती तो आरोपी मलंग त्यांचे खिशातला होता, की ते त्याच्या खिशात होते... याचा उलगडा नंतर झाला. त्यांनी सकाळी सर्व कनिष्ठांना दम दिला. पेपर्स ताब्यात घेतले. मला तपास करायचा अधिकार काढून घेतला. PSI तेंडुलकर याला मी केलेला पंचनामा चक्क बदलायला लावला. त्यांचा आवडता आरोपी मलंगला त्यातून बिनधास्त वगळूनच टाकलं की! लगेच IPS वगळ यांनाही कळवलं... तेही संतापले. सांगूनसुद्धा ऐकत नाही म्हणजे काय?

मित्र हो, हीच दयनीय परिस्थिती, या मुंबई पोलीस दलात आहे. गुन्हेगारावर कारवाई करण्याचं स्वातंत्र्य पोलिसांना नाहीच. वरिष्ठांची मर्जी असेल तरच, कारवाई करता येते. त्यांच्या मर्जीविरुध्द जरा कोण वागला की, थेट ALL THE WAY FOR 4 RUNS; बाऊंड्रीच्या बाहेर चौकारच! मग कोण, त्यांच्या मर्जीविरुद्ध जाईल? प्रत्येकाच्या डोळ्यासमोर आपलं घर, आपली पत्नी, पिल्लं येतात अन् सगळे मुकाटपणे सहन करतात...सांगायचं तरी कुणाला? मग हा राग समोर येणाऱ्या सामान्य नागरिकावर उतरला नाही, तर नवलच..हीच खरी शोकांतिका! मग वरिष्ठांच्या मोठ्या कामात सहभागी व्हावे लागते. केसपेपर्स कनिष्ठच तयार करतात ना? हे कधी पेपरवर पेनच टेकवत नाहीत. पेपर्स फक्त, पाहतील. लिहिणार अजिबात नाहीत. कारण नंतर कोर्टात कोण जाणार? IPS ही जमात कोर्टाला फारच वचकून असते.

कोर्टाच्या पिंजऱ्यात यांना घाम फुटतो; सवयच नसते ना! हे कोर्टात सहसा कधि जातच नाहीत; मुंबई पोलीसांच्या इतिहासातल्या मोठमोठ्या एका तरी केसमध्ये IPS कोर्टात उभे राहिल्याचे दाखवा? यांचे सगळे बार हवेतच...!!!

IPS सुरेंद्र पाण्डेय यांनी PSI तेंडुलकरला तोंडी आदेश देऊन पंचनामे बदलले... हा अतिशय गंभीर गुन्हा आहे. पण, ते पडले वरिष्ठ! बोलणार कोण? ही ब्रिटीश स्टाईल, फोडा आणि झोडा! मला त्यानी नि:शस्त्रच केलं होतं.

आता पहा... पंचनामे त्यांनी बदलले आणि बोंब अशी ठोकली की, कोकीळनेच खोटी केस केली. तीही माफियावर! मलंग हा आरोपीच नव्हता. पण, त्याला खोटी अटक केली... बोला? आता यालाच तर चोराच्या उलट्या बोंबा, म्हणत नसावेत? आरोपी मलंग यास पाण्डेय यांनी सोडले, वरती पंचनामे त्यांनी बदलले, आणि दोषी मात्र मी? व्वा रे IPS, तोहरा जवाब नाही! मित्र हो, हेच तर षडयंत्र होते माझ्याविरुद्ध. माझी तिरडी बांधायचीच तयारी, या सर्वांनी केली होती. परस्पर माझ्याविरुद्ध अहवाल दिले गेले, मला न विचारपूस करता. आता फेब्रुवारी २००३ उजाडला. मी अजून ही नि:शस्त्रच होतो... गप्प होतो. नाईलाज होता. आणि दिवस उजाडला.... १४ फेब्रुवारी २००३!

सकाळी सकाळी घरचा फोन खणखणला. मी भायखळा येथे घरी थकून झोपलो होतो... उठलो, फोन उचलला, पलिकडून मित्राचा आवाज, ‘‘कोकळ्या, काय लफडा केलास रे! मी दणकलो, म्हटलं... काय झाले रे? अरे आजचा महाराष्ट्र टाइम्स बघ. वाट लावलीय तुझी ...बातमी वाच. बातमी फ्रंट पेजवर आहे. त्याने फोन बंद केला.

**मी धडपडत उठलो. महाराष्ट्र टाइम्स पाहिला, पहिल्याच पानावर ठळक बातमी भर्रकन वाचली. मी मनोमन हादरुन गेलो. मलंग आरोपीविरुध्द मी खोटी केस केली, म्हणून मला निलंबित करण्यात येणार असून, माझ्या या कृत्यानं मुंबई पोलीस दलात प्रचंड संताप पसरला आहे, अशी ती बातमी होती.** *...(पान क्र. १२ वर)*

## *''महाराष्ट्र टाइम्सचा वैचारिक गर्भपात''...*

*...(पान क्र. ११ वरुन)* **मी थक्क झालो... एवढे असत्य! ते ही दोन दोन IPS मिळून ...माफिया आणि छगन/समीर या जोडीला खूष करण्यासाठी? काहीच लाज राहिली नाही कुणाला. .प्रचंड धक्का हा होता की, संपादक भरतकुमार राऊत/ज्येष्ठ पत्रकार संजय व्हनमाने यांनीही, या नीच कटात सामील व्हावं?** कशासाठी, ते माहीत होतंच. प्रसार माध्यमांवर विश्वास उडावा, अशीच बाब नव्हे काय? चीड उत्पन्न झाली मनात. धावत पळत ऑफिस गाठलं...चौकशी केली...सर्वजण माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पहात होते. मला टाळत होते. माझ्यापासून दूर पळत होते. जणू काय, मी देशद्रोहच केला, माफियावर केस करुन! वरिष्ठ निरिक्षक राजेभोसले आता माझ्याकडे तुच्छतेने पहात होते. मग्रूर होऊन बोलले, जा कुठं जायचं तिकडे जा आणि विचार... मी धास्तावलो, समजेना काय करावं!

**वकिल मित्रांना गाठलं, चर्चा केली. इकडे दोन दिवसातच माझ्या हातात बदलीची ओर्डर करुन ठेवली. आता मात्र, मी संतापलो. सरळ प्रामाणिक ड्युटीचं, हे फलित? सरळ मॅट कोर्ट गाठलं. केस ठोकली! तोपर्यंत, माझ्या मित्रांनी खबर सांगितली...बाँबच टाकला की डोक्यावर! कोकिळ, त्वरीत हालचाल कर; नाहीतर, तुला दोन दिवसात खोट्या केसमध्ये अटक करण्याची तयारी झाली आहे. मी मनोमन हादरलो. माफियावर केस केली म्हणून? तीही खरी? काय चाललंय काय?** दुसऱ्या दिवशी मॅट कोर्टात जलद हालचाल केली. मॅट कोर्टाने बदलीला स्टे दिला. माझी फिर्याद न्याय दाखल झाल्याने, माझी अटक टळली होती. IPS **वगळ**/IPS पाण्डेय/समीर/छगन भुजबळचा डाव उधळला गेला होता. आता मात्र माझं चित्त खवळलं. मला अटक करवून, माफियांना वाचवण्याच्या कटात महाराष्ट्र टाइम्सच्या तालेवार संपादक आणि पत्रकारांनी इतक्या खालच्या पातळीला येऊन सामील व्हावं? कट यशस्वी व्हावा; म्हणून, माझ्यासारख्या यत्किंचित इन्स्पेक्टरची बातमी पहिल्या पानावर? अजून कमी पडले म्हणून की, काय... दुसरा बदनामीकारक लेख, आत ११व्या पानावर? मला फक्त, बदनाम करण्यासाठी??

**IPS वगळ ना माझी अटक सुलभ करता यावी; म्हणून, ही क्लृप्ति? केवळ छगनराव न् समीर आनंदाने नाचावेत, म्हणून? याला काय म्हणावं? लोकशाहीचा हा एक खांब ''खंब्यासाठी'' विकला जावा? काही मूठभर ठेव्यावर? भ्रष्टाचाराची नीच पातळीच नव्हे काय? माझ्या दृष्टीने तर, ''महाराष्ट्र टाइम्सचा हा वैचारिक गर्भपातच''!**

इतकं चांगलं वृत्तपत्र, तुम्ही किती गर्हणीय कृत्यासाठी वापरलं? मी ठरवलं, प्रसारमाध्यमातील या बड्या धेंडांनी केलेल्या अन्यायाला भिडायचंच!! आणि भिडलो... सरळ माझगाव कोर्ट गाठलं आणि महाराष्ट्र टाइम्सचे संपादक/पत्रकार/प्रकाशक यांचेवर माझी बदनामी केल्याबद्दल खटला दाखल केला... एक कोटी रु. अब्रूनुकसान भरपाईसाठी सेशन्स कोर्टात वेगळा खटला ठोकून दिला. सगळीकडे पळापळ सुरु झाली. मी आता सेफ झालो होतो. छगनराव/मगनराव आणि कंपनीच्या कटाचा पार विचका झाला होता. नियती माझं रक्षण करण्यात दक्ष होती, हेच खरे!

**इकडे मॅट कोर्टात निकाल माझ्या बाजूने लागला. ८ महिने लागले. माझी बदली रद्द झाली. तसा विजय झाला होता, पण, माफियांची सरशी झाली होती. छगन/मगन कंपनीनं मला वर्षभर निशःस्त्र करून ठेवल्यानं माफियांनी उच्छाद मांडला होता. आता माझी रेकॉर्डवर तीन वर्षे पूर्ण झाल्याने माझी बदली विशेष शाखेत झाली. चांगले अधिकारी ''डंपिंग करायची शाखा'' म्हणतात, या शाखेला!**

समीरनं वगळ/पाण्डेय या IPS दुक्कलीवर कौतुकाचा वर्षाव केला. त्यानंतर, त्या शाखेचे पंख, असे कापले गेले की, माफियांना कोणी परत त्रास देऊच नये. मी निर्भीड होऊन केलेल्या कारवाईचं रेकॉर्ड, आजही अबाधित आहे. विशेष शाखेत बदली करुन मला दाबून टाकलं गेलं. पण, आता नियतीनं फासे आपल्या हाती घेतले होते. ती गप्प बसणार थोडंच? शांतपणे छगन/मगन कंपनीचा खेळ ती जोखत होती. नोंदही घेत होती. दुर्योधन/दुःशासनाभोवती फास आवळत होती, हळूहळू! छगन/मगन बेसावध, पण मस्त होते, आपल्याच मस्तीत!!

**कसे? ते पुढच्या एपिसोडमध्ये लिहीतोच आहे. तूर्त... महाराष्ट्र टाइम्सवर दाखल खटल्याबद्दल जरा बोलतो. मलंगच्या बातमीवरुन माझ्यावर खात्याने चौकशी लादली. २००४मध्ये सुदैवानं ती चालली, निस्पृह आणि निःपक्ष महिला IPS फर्नांडिस यांचे समोर. माझ्यातर्फे बचाव केला, माझे मित्र/वरिष्ठ अधिकारी ACP अरुण वाबळे यांनी... हे तेच तपास अधिकारी, ज्यांनी IPS ए.के. जैन या भ्रष्ट अधिकाऱ्याची Anti Corruptionची केस यशस्वी तपास करुन, डीसीपी एम.टी. कोहे, यांच्या मदतीने, जैन यांना ५ वर्षे सश्रम कारावास होण्यापर्यंत कोर्टात फरपटत नेलं. कुशाग्र बुद्धीचा मनस्वी अधिकारी! मुंबई पोलीस दलाची शान म्हटलं तरी हरकत नाही. आज सिटी बँकेत डायरेक्टर पदावर कार्यरत आहेत, हुशारीच्या जोरावर.**

पण त्यावेळी, माझ्यावर अन्याय झाला म्हणून मदतीला धावले. असा बचाव केला माझा की, यंव रे यंव. चौकशी अधिकारी IPS फर्नांडिस मॅडम यांच्यापुढे सिध्द झालं की, PSI तेंडुलकर यानी IPS पाण्डेय यांच्या आदेशानुसारच पंचनामा बदलला. खोट्या जबान्या दिल्या, त्या मला अडकविण्यासाठीच! मलंगला पळवलं, ते मला अटक करता यावे, म्हणूनच. तेंडुलकरनी गुन्हा कबूल केला, रडला आणि पाय धरले फर्नांडिस मॅडमचे! IPS फर्नांडिस मॅडमच्या लक्षात छगन/मगन कंपनीचा डाव आला. त्यांनी या कटास मूठमाती दिली. संजीव कोकीळ यांस निर्दोष जाहीर केलं!

पण उपयोग काय? मनस्ताप किती? किती नुकसान झालं? माफिया जेरबंद होता होता सावरले होते. वर्षभर मला नोकरी करु दिली नाही. माफियानी मात्र, उखळ पांढरं करुन घेतलं. त्यानंतर भेसळीचा बाजार प्रचंड उसळला होता....मी हताशपणे पहात होतो. माझ्या हाती काहीच नव्हतं!

**महाराष्ट्र टाइम्सची केस मी लावून धरली होती. तारीख पे तारीख पडत होती. IPS फर्नांडिस मॅडमनी दिलेला निकाल मी कोर्टात सादर केला होता. माझी बाजू मजबूत झाली होती. भोईवाड्याचे निष्णात वकील शरद मोकाशी यांनी माझ्यावतीने जोरदार युक्तिवाद केला. साक्षी/पुरावे/उलटतपासणी सगळं पार पडलं. मटावाल्यांनी बातमी खरी असल्याचं तुणतुणं वाजवून पाहिलं. पण, बातमीची सत्यता सिद्ध करण्याची जबाबदारी, ही त्यांचीच होती. ते त्यांना जमले नाही.**

दि. १० मार्च २०१६. निकालाचा दिवस उजाडला. २५ नंबर कोर्टात खचाखच गर्दी. दुपारी १ वाजता पुकारा झाला. आरोपी क्र १ भरतकुमार राऊत, संपादक! आरोपी क्र २ सॅम दस्तूर, प्रकाशक! व आरोपी क्र ३ संजय व्हनमाने, पत्रकार हाजीर होती !

**तीनही आरोपी पिंजऱ्यात उभे. आमची उत्सुकता शिगेला. न्यायमूर्ती सी.व्ही. मराठे साहेबांनी निकाल पत्र उघडलं. आरोपींकडे कटाक्ष टाकला आणि धीरगंभीर आवाजात उच्चारण केलं, तुम्ही दोषी आहात. कोकीळ यांची बदनामी केल्याबद्दल मी आपणांस शिक्षा करणार आहे. आपणास त्याबद्दल काही म्हणायचे आहे काय? आरोपीनी माना खाली घातल्या/सर्द झाले. त्यांचे वकिलांनी कशीबशी कमी शिक्षा द्यावी, म्हणून याचना केली. माझे वकील मोकाशींनी हरकत घेतली. न्यायमूर्तींनी माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकला. तक्रारदार म्हणून मला बोलायची संधी दिली. क्षणात माझ्या डोळ्यासमोर १३ वर्ष भोगलेला मनस्ताप तरळला... मी उसळून म्हणालो, युवर ऑनर (कोर्टात पिनड्रॉप सायलेन्स). महाराष्ट्र टाइम्स, हे एक जबाबदार वृत्तपत्र असून त्यातील बातमी लोक खरी समजतात. अशिक्षित गुन्हेगारांनी केलेला गुन्हा व भरतकुमार राऊत/व्हनमाने सारख्या सुशिक्षित, विचारवंतांनी जाणिवपूर्वक केलेला गुन्हा, यात फरक केला पाहिजे. अशा खोट्या बातम्या पेरल्याने, पोलीस खात्यात इमानेइतबारे काम करणाऱ्या कितीतरी अधिकाऱ्यांचं करिअर उध्वस्त झालं आहे. ते पुन्हा घडू नये म्हणून... आरोपींना कसलीही दयामाया न दाखवता कडक शिक्षा देण्यात यावी. कोर्टानं माझं म्हणणं नोंदवलं, मान्य केलं आणि शिक्षा सुनावली. ६ महिने कैद अधिक रुपये १०,००० दंड! माझ्या मनावर मोरपीस फिरत होतं. न्यायदेवतेनं न्याय केला होता. मी सुखावलो होतो. न्याय मिळाल्याचं विलक्षण समाधान होतं. आरोपींचे चेहरे घामानं डबडबले होते... बरोबर आहे ना? महाराष्ट्र टाइम्सचा हा वैचारिक गर्भपात होता, हे आता सिद्ध झाले होते.**

प्रसार माध्यमातील नामवंत संपादक/पत्रकार यांनी केवळ पुढारी/भ्रष्ट IPS अधिकारी यांच्याकडून काही लाभ मिळतो का... या हावरट आशेने, अशी घृणास्पद कृत्ये करावी का? आपल्या लोकशाही मूल्यांना/तत्त्वांना चक्क हरताळ फासावा का? पायदळी तुडवावं का? माफियांची बाजू घेऊन, उलट नीटसपणे कर्तव्य पार पाडणाऱ्या पोलिसालाच अडकविण्यासाठी वृत्तपत्राचा वापर करावा का? याचा जाब, आता प्रत्येकानं मिडीयाला विचारलाच पाहिजे! नाही तर सांगा, पोलीसांनी कसं काम करायचं? कोणासाठी हकनाक मरायचं??

**या अशा महाभागांना, समाजात खूप मान दिला जातो. पोलीस मात्र, दिवसेंदिवस पिचत चाललाय, त्याला कोणीच वाली नसल्यासारखा! कारण, छगन / मगन सारखे पुढारी आणि त्यांना कडक सॅल्यूट ठोकणारे खड्ड अधिकारी (काही अपवाद) फक्त, आपल्याच तुंबड्या भरणार असतील, तर आणखी काय होणार?**

**मित्रहो, सन २००३ पर्यंतचा, मी पाहिलेला हा खाकी गेम! या नंतर नियतीने छगन/मगन/IPS वगळ/DCP प्रदीप सावंत यांचा कसा सूड घेतला, भ्रष्ट IPS लॉबीला मुंबईच्या वर्चस्वावरुन कशी घमासान लढाई चालते, ते पुढील एपिसोड मध्ये मांडतो!**

**''तेल घी आणि बडगा नियतीचा...!!!''**

# ‘धर्मराज्य पक्षा’च्या कायदेशीर लढाईच्या इशाऱ्यानंतर,कॅबचालकास ठाणे आरटीओकडून परमिट जारी !

**ठाणे (प्रतिनिधी) :** नवीन परमिट प्राप्त करण्यासाठीची पूर्ण रक्कम भरुनही, दीड वर्ष उलटूनदेखील कुलकॅबचालकास नवीन परमिट देण्यात आलेला नसल्याची घटना काही दिवसांपूर्वी उघड झाली होती. ‘धर्मराज्य पक्ष’प्रणित, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ’अंतर्गत कार्यरत असणाऱ्या ‘धर्मराज्य रिक्षा-टॅक्सी चालक, मालक संघटने’चे सदस्य कृष्णा रामजनम पटवा यांनी, आपल्या कुलकॅबच्या नवीन परमिटसाठी दि. ७ जून-२०२२ रोजी, २५,०००/- रुपयांचा धनादेश ठाणे आरटीओकडे अदा केल्यानंतर, सदर रक्कम ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या बँक खात्यात जमा झाली होती. या घटनेला दीड वर्षाहून अधिक काळ उलटूनही, ठाणे आरटीओ कार्यालयाकडून, कृष्णा रामजनम पटवा यांना, नवीन परवाना देण्यात आलेला नव्हता. यासंदर्भात **‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’च्या वतीने, परिवहन अधिकाऱ्यांकडे लेखी पत्राद्वारे तक्रार करण्यात आली होती, शिवाय बँक स्टेटमेंट आणि धनादेशाची प्रतदेखील तक्रार अर्जासोबत जोडून देण्यात आली होती. नवीन परमिटसाठीची पूर्ण रक्कम अदा केलेली असतानाही, ठाणे आरटीओ कार्यालयाकडून कोणत्या कारणाखाली ही दिरंगाई करण्यात आलेली आहे? असा प्रश्न ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष तसेच, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी, ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना आपल्या तक्रारीद्वारे उपस्थित केला होता.**

दरम्यान, ‘धर्मराज्य रिक्षा-टॅक्सी चालक, मालक संघटने’चे सदस्य असलेले कृष्णा रामजनम पटवा यांना, घटनेमुळे फार मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. त्याचबरोबर आरटीओ कार्यालयाकडून देण्यात न आलेल्या नवीन परमिटअभावी, त्यांना व्यवसाय करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते. **पटवा त्यांची स्वत:ची कोणतीही चूक नसताना, परमिटअभावी त्यांच्यावर आरटीओच्या किंवा वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. कॅबचालक कृष्णा रामजनम पटवा यांनी, दीड वर्षापूर्वी धनादेशाद्वारे भरलेली २५,०००/- रुपयांची रक्कम नेमकी कुणाच्या आणि कुठल्या शासकीय किंवा खासगी खात्यात गेली, अशी शंका निर्माण झाल्यानंतर, यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती सखोल चौकशी करावी व नवीन परमिट अदा करण्याबाबतची कार्यवाही त्वरित पूर्णत्वास न्यावी, अन्यथा आम्हाला आपल्या कार्यालयाच्या अशापद्धतीच्या हलगर्जीपणाबद्दल, आपल्याविरोधात कायदेशीर दाद मागावी लागेल, असा इशारा ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष तसेच, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव महेशसिंग ठाकूर आणि ‘धर्मराज्य रिक्षा-टॅक्सी चालक, मालक संघटने’चे ठाणे युनिट उपाध्यक्ष सुशीलकुमार चंद्रा व रवी मिश्रा यांनी आपल्या पत्राद्वारे दिल्यानंतर, अखेर ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी, आठ दिवसांतच कृष्णा रामजनम पटवा यांना, नवीन परमिट जारी केले असून, याबाबत ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने, अशाप्रकारचा हलगर्जीपणा पुन्हा घडणार नाही, याबाबत भविष्यात काळजी घेण्याची विनंती करण्यात आली आहे.**

---

आपल्या महाराष्ट्रदेशाची व त्यातील सर्वसामान्य मराठमोळ्या माणसांची, भांडवलशाहीतल्या उन्मत्त भांडवलदारवर्गाने (ज्यात, प्रामुख्याने गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाची जमात व त्या जमातीचं ‘महाराष्ट्र-घातकी’ राजकारण-अर्थकारण आलंच... ‘‘महाराष्ट्रात निर्माण झालेली संपत्तीच, मराठी माणसांच्या व महाराष्ट्रातील निसर्ग-पर्यावरणाच्या मुळावर येण्या’’एवढं, जे महाराष्ट्रासाठी व मायमराठ्यांसाठी ‘अनर्थकारक’ ठरलंय!) जी एकूणच कुचंबणा व कुंठीत अवस्था करुन त्यांना वेठीला धरलंय...त्यासंदर्भात, मराठी-जनहितार्थ ‘STATUS’ मधून गेले अनेक दिवस, टप्प्याटप्प्याने चालू असलेल्या, लिखाणाच्या उपक्रमाचा ‘एक अंश’, ‘धर्मराज्य पक्ष’ स्थापना-दिनानिमित्त, वाचकांसमोर उलगडून दाखवत आहोत...त्याचा स्विकार व्हावा, ही नम्र विनंती, धन्यवाद!



**सत्य, समता, बंधुता, राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मचिकित्सा या सत्यशोधक मूल्यविचारांच्या जागरणासाठी, ‘सत्यशोधक विचार संवर्धन समिती, ठाणे’ यांच्या वतीने, दि. २७ नोव्हेंबर-२०२३ रोजी, ‘सत्यशोधक दिंडी’चे आयोजन करण्यात आले होते. ठाणे शहरातील नौपाडा परिसरात असलेल्या भगवती शाळेच्या मैदानातून सुरु झालेल्या या ‘सत्यशोधक दिंडी’त ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, आवर्जून सहभाग घेतला होता.** महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या सत्यशोधक समतावादी विचारांचा जागर करण्यासाठी, या ‘सत्यशोधक दिंडी’चे आयोजन करण्यात आले होते. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या ‘सत्यशोधक समाजा’च्या स्थापनेस यंदा १५० वर्षे पूर्ण होत असल्याने, तसेच दि. २८ नोव्हेंबर रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून, ही ‘सत्यशोधक दिंडी’ काढण्यात आली होती. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक या तिन्ही स्तरांवर सर्वप्रकारच्या शोषितांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, महात्मा ज्योतिबा फुले आयुष्यभर झटले. जातीभेद, लिंगभेद, धार्मिक कर्मकांड आणि अंधश्रद्धेच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. त्यांचाच वारसा पुढे नेण्यासाठी ही ‘सत्यशोधक दिंडी’ आयोजित करण्यात आली असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. दरम्यान, चंदनवाडी येथील कॉ. गोदूताई परुळेकर उद्यानात या दिंडीची सांगता झाली. **यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगारनेत्या कॉ. मुक्ता मनोहर, तर ‘सत्यशोधक समाजा’चे अध्यक्ष के. इ. हरदास हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक आणि समाजवादी विचारवंत अब्दुल कादीर मुकादम यांचा फुले पगडी परिधान करुन सत्कार करण्यात आला.** या सत्यशोधक दिंडीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार श्रीमती सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव महेशसिंग ठाकूर, समीर चव्हाण, भारतीय महिला फेडरेशन, स्त्रीमुक्ती संघटना, इंटक कामगार संघटना, समता विचार प्रसारक संस्था, बँक एम्प्लॉईज असोसिएशन, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, स्वराज अभियान, कोळीवाडे संवर्धन समिती, कायद्याने वागा लोक चळवळ, प्रागतिक पत्रकार सामाजिक संस्था, म्युज फाऊंडेशन, महाराष्ट्र महिला परिषद, श्रमिक जनता संघ, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका संघ, शेतकरी कामगार पक्ष आदी संघटनांचे पदाधिकारी व समविचारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# भारतीय परराष्ट्रनीतिचा पोकळ डोलारा!

केवळ साडेतीन लाख मूळ नागरिक व २३ लाखाच्या आसपास देशाबाहेरचे स्थलांतरित मजूर (त्यातले १० लाख भारतीय, अर्थातच प्रामुख्याने केरळी)...अशा, अंगाने अगदीच किरकोळ असलेल्या, एका कतार नावाच्या देशाने, भारतासारख्या खंडप्राय देशाला एकदा नव्हे; दोनदा फटकारत, आपल्या देशाची आणि देशाच्या तथाकथित 'विश्वगुरुं'च्या अब्रूची लक्तरं, ''कतारी देशाच्या कुंपणाच्या तारी, वाळवंटात वाळत घालावीत''???

**...पहिल्यांदा भाजपाच्या नुपूर शर्मा-नवीन जिंदालकृत प्रेषित महंमद पैगंबरांच्या अवमानप्रकरणी आणि आता दुसऱ्यांदा, आठ भारतीय माजी नौसैनिकांना, इस्त्रायल देशासाठी हेरगिरी केल्याप्रकरणी, बेधडक फाशीची सजा कतारी-न्यायालयातर्फे फर्मावली जाण्यामुळे!**


**...शक्य आहे की, कतारी-बादशहाकडे नाक घासून (एकतर, २०२४ची लोकसभा-निवडणूक आणि दुसरं म्हणजे, त्यातील 'पूर्णेंदू तिवारी' हा 'भोपाली' असल्याने, मध्यप्रदेशची निवडणूक तोंडावर असताना तोंडावर आपटायला नको म्हणून, केवळ) या आठ माजी नौसेना अधिकाऱ्यांना सोडवले जाऊही शकेल... पण, ''बूँद से गयी, वो हौद से नहीं आती'' उक्तिप्रमाणे, 'गोदी-मिडीया'तून फुकटचा फुगवला गेलेला 'विश्वगुरुपदा'चा फुगा (विशेषतः, G20 च्या काळात), आता फट्ट फुटल्यागत झालाय!**

जेव्हा, घरातल्या कारभाऱ्याला घरात कुणी विचारत नाही... तेव्हा, बाहेर आपली कशी 'वट' आहे, हे तो कारभारी आणि त्याने पोसलेले त्याचे चमचे, छत्रपतींच्या तेराव्या वंशजांसारखे 'कॉलर-टाईट' करुन, गावभर हिंडत सांगत सुटतात... त्यातलाच, हा केविलवाणा प्रकार म्हणायचा.

हा सगळा प्रकार तब्बल गेले १४ महिने सुरु असूनही, 'गोदी-मिडीया'ने आणि भारतीय परराष्ट्र खात्याने त्याची फारशी दखल घेतली नाही (त्याकाळात, आपलं सरकार ईडीच्या धाडी टाकून विरोधी पक्ष आमदार फोडाफोडीत आणि BBC सारख्या वाहिन्यांवर धाडी टाकण्यात मग्न होतं आणि कतारमध्ये तब्बल तीन महिने भारतीय राजदूत नेमला गेला नव्हता) आणि आज या थराला या गोष्टी गेल्यात की, ज्यामुळे भारतीय परराष्ट्रनीतिचा पोकळ डोलारा, जगासमोर साफ कोसळून पडलाय.

जिथे चीनच्या तुलनेत भारतीय सैनिक मोठ्याप्रमाणावर शहीद झाले, त्या भूतान-चीन-सिक्कीम सीमेवरील 'डोकलाम' बद्दल, आम्ही आता ब्रदेखील काढत नाही (ते आपल्या हातून चिन्यांनी हिसकावून घेऊन, तिथे रेल्वेमार्गासह गावच वसवलंय) आणि आता, लडाख-अक्साईचीन सीमेवरील 'गलवान' भोवती चीन, आपला गळा आवळत चाललाय.

भूतानला एकदा का 'डोकलाम'सारख्या ठिकाणाहून




रेल्वेमार्गे पेट्रोल-डिझेलचा पुरवठा (ज्यावर, तो देश आजपर्यंत पूर्णपणे भारतावर अवलंबून होता) चीनने सुरु केला की, आपल्या पारंपारिक मित्र भूतानचा 'अवतार' कसा बदलेल, तो पहाच. आजच, ज्या भूतान देशाच्या भूमिचं आपल्या पंतप्रधानांनी 'चुंबन' घेतलं होतं... तो देश, चीनशी चुंबाचुंबी करण्यात गर्क आहे आणि तिचं गत नेपाळचीदेखील.

**जगातलं कालपरवापर्यंतचं एकमेव 'हिंदू-राष्ट्र' म्हणून भाजपा-संघीय लोकं ज्याला गौरवत आलेत आणि जो त्यांच्या काल्पनिक (जे त्यांच्या सहस्त्र जन्मात सत्यात उतरणे शक्यच नाही, हे ते स्वतः चांगलंच जाणून असावेत... पण, मुसोलिनीसारखं ख्रिस्तपूर्व रोमन-साम्राज्याच्या विस्ताराचा दाखला देऊन 'ग्रेटर इटली किंवा अखंड इटली'सारख्या 'अखंड हिंदू-राष्ट्रा'च्या मोठमोठ्या बाता मारायला कोणाचं काय जातं?) 'हिंदू-राष्ट्रा'चा अविभाज्य भाग आहे... तो नेपाळ देशही, आता तुमच्याकडे गुरकावून बघतोय आणि चीनशी घनिष्ट मैत्री करतोय.**

चीन तर, आपला कायमचा शत्रूच; पण, इंदिराजी पंतप्रधान असताना बांगलादेश निर्मितीच्या संकटकाळात आपल्या पाठिशी उभा राहून पाकिस्तानच्या मदतीला आलेल्या अमेरिकेच्या सातव्या आरमाराला रोखणारा आणि आपल्याशी २५ वर्षांचा मैत्री-करार करणारा रशियादेखील (तत्कालीन, सोव्हिएत युनियन) आता, पाकिस्तानसोबत सैन्याच्या कवायती करायला लागलाय.

** पाकिस्तानचं सोडाच... पण बांगला देश, श्रीलंका म्यानमार या सख्ख्या शेजाऱ्यांची चीनशी एवढी घसट वाढलीय की, ते तुमच्याशी एकदम फटकून वागू लागलेत.

**ना आम्ही रशिया-युक्रेन युद्ध समाप्तीसाठी काडीमात्र योगदान देऊ शकत... ना इस्त्रायल-हमास संघर्षात कुठली ठाम भूमिका बजावून युद्धविराम घडवू शकत; तरीही, आम्ही 'गोदी-मिडीया'कडून मिळवलेल्या बोगस प्रमाणपत्राने (तसंही आपल्याकडे बड्या राज्यकर्त्यांच्या शैक्षणिक पदव्या बोगसच असतात, त्यातलाच प्रकार) गेल्या नऊदहा वर्षांत 'हिंदू-राष्ट्र' घडवता घडवता, एकदम थेट हनुमान-उडी मारुन 'विश्वगुरु'च बनलोय.** या सगळ्या, 'भाजपा-आयटी सेल'मधल्या मर्कटांच्या व गुजराथमधली जी लोकं बाहेरच्या देशांमध्ये गेलीत (प्रामुख्याने अमेरिकेत) त्यांच्या पुढाकाराने चाललेल्या लज्जास्पद प्रकाराला काय म्हणावं? आणि, जगात आपलं हसं तरी किती व्हावं (एका विश्वासार्ह अमेरिकन सर्वेक्षणात 'स्वयंकेंद्रित जीणं जगणाऱ्या' अमेरिकनांना पैकी ५६% लोकांना नरेंद्र मोदी, भारताचे पंतप्रधान आहेत, हेच ठाऊक नसल्याचं उघड झालंय)??

तेव्हा कृपया, रवीश कुमार आणि दीपक शर्मा यांचे व्हिडीओ पाहण्याची तसदी घेऊन, सत्यस्थिती पूर्णतया जाणून घ्यावी, ही 'धर्मराज्य पक्षा'तर्फे वाचकांना नम्र विनंती!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

महाराष्ट्र राज्यातील १०० टक्के अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांना, नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी या मागणीसाठी, 'छत्रपती शाहु महाराज अनुदानित वसतिगृह कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य' या संघटनेचे पदाधिकारी श्री. उत्तम मगर, श्री. गणेश कोरडे, श्री. मुकुंद हेप्परकर आणि श्री. नागसेन पवार यांनी, दि. २० नोव्हेंबर-२०२३ रोजीपासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे. ''समान काम, समान वेतन'' या तत्त्वानुसार, दुसऱ्या योजनेतील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करावी, अशी संघटनेची मागणी असून, दि. २८ नोव्हेंबर-२०२३ रोजी, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, या उपोषणकर्त्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि आमच्या पक्षाच्या माध्यमातून, शासन-दरबारी याचा पाठपुरावा करुन, तुम्हाला न्याय्य मिळवून देण्याचा प्रयत्न करु, असे आश्वस्त केले. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. नरेंद्र पंडित आदी पदाधिकारी उपस्थित होते.



(ख्यातनाम कायदे-तज्ज्ञ असलेले माझे एक स्नेही, नुकतेच प्रदीर्घ लडाख-भेटीवरुन परतले... त्या अनुषंगाने, पार्टी-पर्यटन संस्कृतीविषयक 'धर्मराज्य-विचारधारे'ची पुनर्मांडणी, ओघाने होतेय... ती, वाचकांपर्यंत जावी, हा सद्हेतू होय!)

मा. वकीलसाहेब, आपला लडाख-भेटीचा संपूर्ण अल्बम, मित्रप्रेमाने काळजीपूर्वक व कौतुकाने पाहीला... तसा त्या मित्रत्वाच्या भिजलेपणातून आपलं 'लडाख-पर्यटन' पहात असताना... माझ्यातला, निसर्ग-पर्यावरण संरक्षण-संवर्धनाबाबत, सदैव जागृत असलेला एक सामान्य कार्यकर्ता, आतून जागा होत जागोजागी मला अस्वस्थ करु लागला... लडाखी-फोटो पहाताना त्याची नजर, नाही म्हटली तरी, प्रतिमेगणिक लडखडत होती.

आपला लडाखी फोटो-व्हिडीयो अल्बम, हा अतिशय कलात्मक आहेच; शिवाय, त्यातील फोटो-प्रतिमा व एकूणच, निसर्गसौंदर्य केवळ अप्रतिमच आहे; तसेच, आपली प्रासंगिक धाडसीवृत्ती दाद देण्याजोगी आहे... त्याबाबत, वाद असू शकत नाही. म्हणून, तुम्हा सर्वांचंच मनःपूत कौतुक!

...पण, आम्हा निसर्ग-पर्यावरणवाद्यांच्या नजरेतून (कदाचित, तुमच्या लेखी, अगदी दुष्ट नव्हे, तरी 'खाष्ट' नजरेतून) पर्यटनातून प्रदुषण आणि प्रदूषणातून सजीवसृष्टीचं उच्चाटन, अशी आमची वैचारिक-भूमिका अथवा दृष्टिकोन असल्याने... आपण सारे व इतर पर्यटनस्थळांनाही वरचेवर भेट देणारे इतर पर्यटक) 'लडाख'सारख्या कुमारी-भूमीत जाऊन कार्बन-प्रदुषण करताहात, असा आमचा गंभीर आरोप आहे... कृपया, त्याची योग्य दखल घेणे व हा संदेश, आपल्या लडाख-ग्रुपवर टाकून संबंधितांच्या प्रतिक्रिया (त्या, कितीही प्रतिकूल व व्यक्तिशः मला, शिव्याशाप देणाऱ्या असल्या, तरीही) कळविणे, ही नम्र विनंती!*

सरतेशेवटी, जे सूत्र आम्ही 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन सातत्याने मांडत असतो, ते हे की, पार्टी-संस्कृतीने मानवी-मनाचं; तर, पर्यटन-संस्कृतीने निसर्ग-पर्यावरणाचं प्रदूषण होतं असतं... त्या अनुरोधाने, शक्य तेवढं व जमेल तेवढं, या दोन्ही प्रदूषणकारी-संस्कृतींना, यथायोग्य मर्यादेचं कुंपण स्वेच्छेनं घालणं आणि इतरांना जमेल तसं, त्यासाठी प्रेरित करणं... हे, अखिल मानवी संस्कृती-सभ्यता व मानवी-अस्तित्व चिरंतन टिकविण्यासाठी अत्यावश्यकच होय.

केवळ, सर्वत्र 'वृक्षारोपण' करण्याने पर्यावरणीय महासंकटातून आपण सुखरुप बाहेर पडू, अशी जर कोणाची भावभावना-संकल्पना असेल; तर, आपण सारेच, मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहोत, असं म्हटलं पाहीजे... मुळातूनच, जिथून 'कार्बन-ऊत्सर्जन' (रासायनिक-आण्विक-विद्युतचुंबकीय प्रारणांच्या रुपातील इतर प्रदूषणंदेखील) होतं, त्या, आपल्याला टाळता येण्यासारख्या सगळ्याच प्रदूषणकारी खाजगी बाबी, आपण शक्य तेवढ्या तातडीने टाळणे, हे आपल्याच हाती आहे व त्याकामी, आपण साऱ्यांनी हाती कंकण बांधून घेतलं पाहीजे... अन्यथा, पुढील पिढ्यांचं (आपली मुलबाळं-नातवंडं-पंतवंडं वगैरे) यांचं अस्तित्वच, आपण आपल्या हाताने धोक्यात आणू...

कृपया, बिलकूल न रागावता, सदरहू संदेशाकडे विधायक व सकारात्मक नजरेनं आपण सारे पहाल व माझे काहीसे कटू बोल समजावून घ्याल, अशी आशा करतो... धन्यवाद!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'.. The First 'Green-Political Party' Of India)

## फारच वास्तववादी लेख

***आज अख्ख्या मराठा समाज आरक्षणासाठी जिवाचा आटापिटा करित आहे. पण, त्यांनी भूतकाळात कमकुवत घटकांवर केलेल्या अत्याचाराच्या खुणा पुसण्यात ते आजही असमर्थ आहेत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शरण गेल्याशिवाय त्यांना गत्यंतर नाही. श्री. सोमनाथ पाटील यांचा लेख खरोखरच वस्तुस्थितीला धरून आहे. मराठवाड्यातील पाटलाचा पोरगा लिहितोय.... खूपच प्रामाणिक लिहिलंय... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना नव्हे, तर आम्हाला माणसात आणलं....!!!***

गावगाड्याबद्दल वाटणारं अप्रूप मला दिवसेंदिवस कमी होत गेलं. गावगाडा गोंडस दिसत असला तरी, तो असंख्य लोकांच्या रक्तावर पोसलेला आहे हे लक्षात येत गेलं. शोषणाच्या संस्कृतीचे शेवटचे अवशेष गावगाड्यानेच जपले. शहरं त्या मानाने लय दिलदार असतात. गावाबद्दल उगं रोमँटिक लिहणारे कवी आणि लेखक लोकं तद्दन भामटे असतात. कारण गावगाडा मांडताना ते आम्हा पाटलांच्या घरांमध्ये देवळीत ठेवलेला फुटक्या बाळीचा कप, आणि सालगडी माणसांची वेगळी ताटं आणि ग्लास कधीच मांडत नाहीत. आमच्या गढ्या आणि वाड्यांच्या मोठमोठाल्या मातीच्या भिंती उभारायला अख्खा महारवाडा जनावरांसारखा राबला. रेड्याच्या पाठीवर लादलेल्या पखालीतून पाणी वाहून कैक माणसांचे पाय वाकडे झाले. आमच्या माड्यांचे अवजड नक्षीदार खांब बनवण्यासाठी लागणारे लाकडं डोंगरातून खांद्यावर वाहून आणल्याने कित्येक खांद्यांना मरणांतिक कळ लागली असेल. आम्ही त्याच्या बदल्यात माणशी शेरभर ज्वारी दिली आणि मोकळे झालो.

**आजपर्यंत शाबूत असलेल्या आमच्या डौलदार माड्या आणि तिच्यावरून दिसणारे कुडाचे, छपराचे महारवाडे पाहत आलो. आता महारवाड्यांचे बौद्धवाडे झाले. कुडाची घरं जाऊन पक्की घरं आली. वेगळा असलेला बौद्धवाडा गावात मिसळून गेलेला दिसतो, ते पाहिलं की मनातला गिल्ट (अपराधिक भावना) काहीअंशी कमी होते आणि म्हणून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावीशी वाटते.**

मोठमोठे झाडं आणि दगड उकरुन याच महारवाड्यातल्या माणसांनी आमचे शेकडो एकरांचे मळे तळहातासारखे सपाट आणि सुपीक तयार करुन दिले. त्याबदल्यात आम्ही त्यांना डाळींचा चुरा, अन कळणा कोंडा खायला दिला. हे कुणीच मांडलं नाही. पन्नासेक जनावरांच्या, म्हशींच्या शेणाच्या पाट्या वाहून त्यांच्या टाळूचे केस गेले. वासरांनी पायावर पाय देऊन अनेकदा रक्ताचे बुरबुडे आले, नखं उचकटली. त्याबदल्यात फक्त तपीलं भरून ताक देऊन आम्ही पाटीलकी दाखवत त्यांची बोळवण केली. ते सगळं डोळ्यासमोर उभं राहिलं की मरुन मेल्यासारखं वाटतं. आज ते सगळं आठवून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावीशी वाटते.

बाबासाहेबांनी दलितांना माणसात आणलं, हे फार चुकीचं वाक्य आहे. बाबासाहेबांनी दलितांना नाही, त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या सवर्णांना माणसात आणलं.

**दलित माणसंच होते. आम्ही माणसासारखं वागत नव्हतो. त्यामुळे बाबासाहेबांचं ऋण आमच्या कातडीचा जोडा शिवूनही फिटणार नाही. कारण दलितांना आमच्यापासून वेगळं केलं नसतं; तर, आम्ही अजूनही त्यांचं रक्त शोषतच राहिलो असतो. म्हणून वाटतं सगळा भंपक माज बाजूला ठेऊन बाबासाहेबांना घट्ट मिठी मारावी.**

लै जुना काळ नाही, गावातल्या शाळेत बौद्धवाड्यातल्या पोरांची रांग वेगळी बसत होती. म्हणजे तसं कॅम्पलसन नव्हतं, पण सामाजिक कंपूबाजपणा आणि हजारो वर्षांची डीएनएच्या जीनमध्ये रुजलेली/ठासून भरलेली शिकवण नकळत आपली विकृती दाखवायची. चौथीच्या मराठीच्या पुस्तकातल्या बाबासाहेबांच्या चित्राला पेनाने चित्र-विचित्र मिशा काढून विद्रुप करायचो. आज ते हटकून आठवतं. अपराधी वाटतं. आणि त्याचं प्रायश्चित्त म्हणून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावीशी वाटते.

जवळच्या निमशहरात शिकायला होतो. एक कार येऊन गल्लीत उभी राहिली. त्यातली माणसं उतरून कुणाच्या तरी घरात जातात. कारच्या मागच्या काचेवर "भीमा तुझ्या जन्मामुळे" लिहिलेलं. आमच्यातला एक थोडा प्रौढ मुलगा गेला आणि खाली त्या धूळ बसलेल्या काचेवर लिहून आला "आम्ही माजलो".... आज ते सगळं आठवलं की वाटतं बाबासाहेबांनी आपल्यापर्यंत पोहोचायला किती उशीर केला. नंतर कळतं आपणच त्यांच्याजवळ जायला उशीर केला. शेवटी अपराधी फील झाल्यावर पुन्हा बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावीशी वाटते.

**वर्णव्यवस्थेचं खापर ब्राम्हणांवर फोडून मोकळे होणारे आम्ही खरे लबाड होतो. व्यवस्था ब्राह्मणांनी तयार केली असली, तरी ती आम्ही उपभोगली, राबवली. कधी कोणता ब्राह्मण गावात अस्पृश्यता किंवा जातिव्यवस्था राबवण्याचं ट्रेनिंग द्यायला आल्याचं आठवत नाही. पण, आज त्यांच्यावर सगळे आरोप ढकलून आम्ही सेफ झोनमध्ये राहण्याचा प्रयत्न करतो. सगळं सगळं साफ समोर दिसतं. पूर्णपणे गंडलोय आम्ही. दिशा दाखवणारे, आम्हाला माणसात आणणारे बाबासाहेब समजून घ्यायला आम्ही उशीर केला. आता समजून घेतोय. बाबासाहेबांचं बोट धरून एक एक पाऊल टाकतोय. माणसात येण्याची प्रक्रिया किचकट असते, हळूहळू प्रयत्न सुरू आहे. भारी फील असतो हा... म्हणून बाबासाहेबांना घट्ट मिठी मारावीशी वाटते....**

**...कारण आम्ही खातो त्या भाकरीवर बी बाबासाहेबांची सही हाय रं...!!**

Thanks Dr. Babasaheb Ambedkar....

- सोमनाथ पाटील (मराठवाडा).

(समाजमाध्यमातून साभार...)

## ऐंशी कोटी लोकांना पाच वर्षे रेशन धान्य फुकट दिलं जाणार आहे...

मग, २०१४ साली देशात गरिबीरेषेच्या खाली असणारे किती कोटी लोक होते ?

२०१४ पासून नेत्रदीपक विकासाचे गुजरात-मॉडेलचे इंजिन लावून विकासाची गाडी धावायला लागलेली आहे... तिने किती कोटी गरिबांना गरिबी-रेषेच्या वर काढलेलं आहे ?

किती कोटी लोकांना रोजगार मिळवून दिलेले आहेत?

जर, वर्षाला कोट्यवधी रोजगार मिळवून दिले जात असतील, तर आणखी उपप्रश्न निर्माण होतात.

समजा, वर्षाला एक कोटी रोजगार मिळाले. एक माणूस एक कुटुंबप्रमुख धरा. त्याच्या कुटुंबात किमान चार माणसे धरा.

२०१४ पासून दरवर्षी जादूची कांडी फिरवून दरवर्षी कोटभर रोजगार मिळाले, असं म्हटलं तर ९ वर्षात ९ कोटी लोकांना रोजगार म्हणजेच, ३६ कोटी लोकांना उत्पन्नाचे साधन मिळाले.

मग, हे ८० कोटी लोक गरीब नेमके कसे?

याआधी, म्हणजे २०१४ पूर्वी हे लोक नेमके कसे जगत होते ? १९४७ पासूनच हे इतके गरीब म्हणायचे असतील; तर, गरिबांच्या देशात इतक्या नवरत्न कंपन्या, आयआयटी, आयआयएम नेमक्या कुणी उभारल्या आणि चालवल्या ?

आम्ही सांगू तेच सत्य आणि आपला मेंदू न वापरता त्यावर विश्वास ठेवा... असं म्हटलं तर, भक्तांनी जरूर ठेवावा.

ज्यांच्या खांद्यावर रिकामं मडकं नाहीये; त्यांनी वरच्या प्रश्नांची उत्तरं शोधावीत....

*(आनंद शितोळे यांच्या फेसबुकवरून)*

In this CNN News18 special interview TMC MP 'Mahua Moitra' (a campaignner against Gautam Adani's alleged illegal business-deals, as revealed through Hindenburg Research and Financial Times Report) comes with all guns blazing... and tears apart the illogical, vindictive, fake and preposterous campaign launched against her, putting at rest all questions raised and suspicious atmosphere created intentionally.

Now, it's time... the nation wants to know, when Gautam Adani, could be taken to task by Indian investigative agencies like SEBI, ED, IT AND CBI...???

(CNN News18 वाहिनीवरील मुलाखतीतून महुआ मोईत्रा, नावाच्या बंगालच्या वाघिणीने, ज्यापद्धतीने अत्यंत धैर्याने आणि कमालीच्या संयमाने हिंडेनबर्ग अहवाल व फायनान्शियल टाईम्सतर्फे आरोपीत झालेला गौतम अदानी, फेक-डिग्रीफेम निशिकांत दुबे आणि दानिश अलींवर भर संसदेत धर्मविद्वेषी गरळ ओकणाऱ्या रमेश बिधुडी सकट, तमाम 'बीजेपी' आयटी-सेलवाले तसेच, दळभद्री 'अंधभक्त'... या सर्वांचेच 'कारनामे' व षडयंत्राच्या चिंधड्या चिंधड्या उडवल्यात, त्या पराक्रमाला 'धर्मराज्य पक्षा'तर्फे खणखणीत त्रिवार सलाम...!!!)

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

| | |
|---|---|
| *पियूष गोयल यांचा मुलगा* | *- हार्वर्ड युनिव्हर्सिटी* |
| *प्रकाश जावडेकरांचा मुलगा* | *- बोस्टन युनिव्हर्सिटी* |
| *राजनाथ सिंह यांचा मुलगा* | *- लिड्स युनिव्हर्सिटी* |
| *रविशंकर प्रसाद यांचा मुलगा* | *- कॉर्नेल युनिव्हर्सिटी* |
| *जितेंद्र सिंहाचा मुलगा* | *- ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी* |
| *निर्मला सीताराम यांची मुलगी* | *-एनडब्ल्यू युनिव्हर्सिटी* |
| *तुमची मुलं* | *- 'व्हॉट्सप युनिव्हर्सिटी'* |

*आता तरी डोळे उघडा... तुमच्या मुलांचे भविष्य बरबाद केले जाते आहे, जेणेकरुन त्यांची मुले तुमच्या मुलांवर राज्य करु शकतील आणि तुमची मुलं 'गुलाम' म्हणून 'जी हुजूर' म्हणत, सेवेसाठी हजर असतील!*

*(समाजमाध्यमातून साभार...)*




---

मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

## 'धर्मराज्य पक्ष'प्रणित
## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'
### या कामगार संघटनेत सामील व्हा !!!



**राजन राजे**
**(अध्यक्ष)**





**महेशसिंग ठाकूर**
**(महासचिव)**
**९७६९५ २५००६**

**रमाकांत नेवरेकर**
**(उपाध्यक्ष)**
**७२०८८ ७९१९७**



**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)